मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

या अंकांत

वर्ष १० | संपादक | डिसेंबर १९५५
अंक ८-९ | दि. ब. पंडित | किंमत. आठ आणे

वि. सा. संघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक :
श्री. दि. ब. पंडित

संपादक मंडळ :
डॉ. ना. के. महाजन
श्री. तु. ना. काटकर
श्री. म. अ. चान्सरकर
श्री. मा. नी. गलगलीकर
श्री. रा. ना. घाटोळे

वर्ष १० वें अंक ८ वा

डिसेंबर १९५५

संपादकीय

युगवाणीचा विनोबा विशेषांक प्रसिद्ध झाल्यावर त्याचें जें वाचकांकडून स्वागत झालें त्याबद्दल संपादकमंडळ वाचकांचें फार ऋणी आहे. तो अंक नित्यापेक्षा अधिक पानांचा होता व हा अंकहि नित्यापेक्षा अधिक पानांचा काढावा लागणार होता म्हणून आम्हाला मधला एक अंक वगळावा लागला.

ह्या विशेष अंकाचें स्वागत झाल्याने आणखी एखादा विशेष अंक काढावा अशी सूचना संपादकमंडळापुढे आलेली आहे. हा विशेष अंक कसा असावा त्याबद्दल संपादकमंडळाने निर्णयहि घेतला आहे.

ठिकठिकाणीं अनेक होतकरू लेखक हस्तलिखित नियतकालिकें काढत असतात. अशा हस्तलिखितांतून पुष्कळदा मंद का होईना पण प्रतिभेचा, व्यासंगाचा, जिव्हाळ्याचा आविष्कार होत असतो. त्यांत आजचा कुमार आणि तरुण कोणत्या वैचारिक, मानसिक आणि बौद्धिक पातळीवर उभा आहे ह्याचें प्रत्यंतर मिळत असतें. आत्माविष्काराची खळखळ आणि तज्जन्य निर्मिति ह्यांच्या दर्शनाने लाभणारी आत्मतुष्टि हीच त्या नियतकालिकाच्या खटाटोपामागची प्रेरणा असते. त्यांत प्रदर्शन आणि प्रसिद्धि ह्यांच्या लोलुपतेने आलेली किंवा प्रसिद्धीनंतर येणारी अहंविशिष्ट आढ्यतेपायी डोकावणारी शबलता नसते. आत्मतुष्टि हाच निर्मितीचा हेतु, हाच आनंद. आपली कृति सजवावी आणि आपणच संतोष मानावा ही नम्रता त्यांत दृग्गोचर होते. नम्रतेला देखील सौंदर्य आहेच.

अशा नम्र सौंदर्याने साजणारे लेख युगवाणीच्या वाचकांना सादर करतां आले तर संपादकमंडळाला फार आनंद होईल. हा प्रयत्न फार जिकिरीचा आहे. अशा हस्तलिखित नियतकालिकांची कुठे नोंद नाही. ठायींठायीं विखुरलेले हे तरुणांच्या उत्साहाचे उद्योग संकलित करायला कालावधि लागणारच आणि त्याला सहकार्य आणि साहाय्य ह्यांची अपेक्षा असणारच.

हें सहकार्य आणि साहाय्य त्या त्या नियतकालिकांचे चालकच करूं शकतील. त्यासंबंधी आमच्या अपेक्षा काय आहेत ह्याबद्दल ह्या लहानशा संपादकीयामध्ये पूर्ण विवरण शक्य नाही. येथे एवढीच विनंती करायची की अशा नियतकालिकांच्या चालकांनी आम्हाला त्यांचा परिचय व्हावा म्हणून पत्रें लिहून निदान आपल्या मंडळाचें आणि नियतकालिकाचें नांव कळवावें. परिचय झाला की साहाय्य आणि सहकार्य पाठोपाठ येईलच व त्याचें स्वरूप खाजगी पत्रव्यवहाराने ठरवितांहि येईल.

कठोपनिषद्

डॉ. के. ल. ऊर्फ भाऊजी दप्तरी

वल्ली चवथी

वल्ली ४ श्लोक १–२

परांचि खानि व्यतृणत्स्वयंभूः ।
तस्मात्पराङ् पश्यति नांतरात्मन् ॥
कश्चिद्धीरः प्रत्यगात्मानमैक्षत् ।
व्यावृत्तचक्षुरमृतत्वमिच्छन् ॥१॥

पराचः कामान् अनुयंति बालाः ।
ते मृत्योर्यंति विततस्य पाशम् ॥
अथ धीरा अमृतत्वं विदित्वा ।
ध्रुवमध्रुवेष्विह न प्रार्थयंते ॥२॥

अर्थः—स्वयंभू ब्रह्माने (ईश्वराने) शरीरास जीं भोकें [खानि] पाडलीं [व्यतृणत्] तीं बाहेर उघडणाऱ्या दरवाजांचीं [परांचि] पाडलीं. त्यामुळे मनुष्य बाहेर पडून जातो व बाहेरच्या विषयांचा [पराङ्] अनुभव घेतो [पश्यति] आंतील आत्म्याचा अनुभव घेत नाही. एखा-दाच शहाणा मनुष्य, आत्यंतिक आनंदाची [अमृतत्वम्] इच्छा करतो आणि डोळे फिरवून [व्यावृत्तचक्षुः] अंतरा-त्म्याकडे [प्रत्यगात्मानम्] पाहतो. ॥१॥ मूर्ख मनुष्य [बालाः] बाह्य विषयसुखाच्या [पराचः कामान्] मागे धावतात [अनुयंति] आणि ते चोहीकडे पसरलेल्या [विततस्य] मृत्यूच्या पाशांत सापडतात [यंति]. परंतु [अथ] शहाणीं मनुष्यें नित्य आत्यंतिक आनंद [अमृत-त्वम्] कोणता: तें जाणून घेऊन [विदित्वा] अनित्य विषयांमध्ये [अध्रुवेषु] नित्य [ध्रुव] आनंद मिळविण्याचा प्रयत्न करीत नाहीत [प्रार्थयंते]. ॥२॥

टिप्पणें:—"व्यतृणत्" ह्यांत रुधादिगणाची तृद् ही धातू आहे. हिचा अर्थ भोक पाडणें. श्लोकाच्या प्रथमार्धाचा अर्थ असा की स्वयंभूने भोक पाडून जे दरवाजे बसविले ते बाहेर उघडणारे केले, म्हणून सामान्य मनुष्य बाहेर विषयांमध्येच पडतो. आंत आत्म्याकडे पहात नाही. (पूर्वी रेलवे डब्यांचे दरवाजे बाहेर उघडणारे असत, त्यांतून पुष्कळ मनुष्यें बाहेर पडत व त्यांस दुखापत होत असे; म्हणून अलीकडे ते दरवाजे आंत उघडणारे केले आहेत. त्यामुळे आता असे अपघात होत नाहीत. हें ज्यांना माहित आहे त्यांना "परांचि खानि व्यतृणत्" ह्याचा अर्थ चांगला समजेल.)

"मृत्योर्यंति पाशम्":—वल्ली ३ श्लोक १५ ह्यांतील "मृत्युमुखात्प्रमुच्यते" ह्यांचें विवरण करण्या-करिताच वल्ली ४ श्लोक १–२ लिहिले आहेत. ह्यांतील "मृत्योर्यंति पाशं" ह्याचा अर्थ "दुःखाच्या व अकाल-मृत्यूच्या कचाट्यांत सापडतो" असा आहे.

वल्ली ४ श्लोक ३

येन रूपं रसं गंधं शब्दान् स्पर्शांश्च मैथुनान् ।
एतेनैव विजानाति किमत्र परिशिष्यते ॥
एतद्वैतत् ॥३॥

अर्थः—ज्या ह्यानेच [येन एतेन एव] रूप, रस, गंध, शब्द, स्पर्श आणि मैथुन जाणतो, त्या अहंकारास काढून टाकलें असतां काय शिल्लक राहतें ? जें शिल्लक राहतें तेंच तें ब्रह्म होय. ॥३॥

टिप्पणें—ह्या श्लोकांत, ब्रह्माचें स्वरूप समजावून देण्याचा प्रयत्न ग्रंथकाराने केला आहे. ब्रह्माचें वर्णन जरी

करतां येत नाही तरी बोटाने एखादी वस्तू दाखवावी तसें ब्रह्म येथे दाखविलें आहे. ह्याचा अर्थ असा की अहंकाराच्या लोपाची जी अवस्था म्हणजे निद्रावस्था तीच ब्रह्माचें मूळ स्वरुप होय. श्री शंकराचार्यांनी ह्या श्लोकाचा अर्थ निराळ्या रीतीने केला आहे. ते म्हणतात, "यस्यात्मानोऽविज्ञेयं न किंचित्परिशिष्यते स आत्मा सर्वज्ञः"। हा अर्थ अग्राह्य दिसतो कारण "जें शिल्लक राहतें तें ब्रह्म" असा अर्थ स्पष्ट दिसतो. मागे "ऋतं पिबंतौ" इत्यादि श्लोकांत ब्रह्माचीं दोन रूपें निर्दिष्ट केलीं आहेत. तीं समजावून देण्याकरिताच हा व पुढील श्लोक दिले आहेत असें समजून ह्या सर्व लोकांचा अर्थ करणें योग्य आहे. म्हणून तदनुसारच आम्ही अर्थ केले आहेत.

वल्ली ४ श्लोक ४–५

स्वप्नांतं जागरितांतं चौभौ येनानुपश्यति ।
महांतं विभुमात्मानं मत्वा धीरो न शोचति ॥४॥
य इमं मध्वदं वेद आत्मानं जीवमंतिकात् ।
ईशानं भूतभव्यस्य नततो विजुगुप्सते ॥
एतद्वैतत् ॥५॥

अर्थः—स्वप्नाची अवस्था [स्वप्नांतम्] आणि जागृतीची अवस्था [जागरितांतं] ह्या दोनहि अवस्था ज्याने जाणतो तो महत्संज्ञक आत्मा म्हणजे अहंरूपी जीवात्मा विभु आहे असें जाणणारा [मत्वा] शहाणा शोक करीत नाही. ॥४॥ हा जीवात्मा [इमम् जीवं आत्मानम्] आनंदाचा उपभोग घेणारा आहे [मध्वदं] असें जवळून [अंतिकात्] म्हणजे दुसऱ्याच्या सांगण्यावरून नव्हे तर स्वतःच्या बुद्धीच्या निर्णयावरून, अप्रत्यक्षपणें नव्हे तर प्रत्यक्षपणे, जो जाणतो आणि हा जीवात्माच भूतभव्याचा म्हणजे मागे झालेल्या व पुढे होणाऱ्या गोष्टींचा ईशान म्हणजे नियामक आहे असें जो जाणतो तो कोणापासूनच स्वताचें रक्षण करण्याची इच्छा करीत नाही म्हणजे कोणालाच भीत नाही. ह्या दोन श्लोकांत वर्णिलेला शहाणा जीव देखील ब्रह्मच होय ॥५॥.

टिप्पणें:—ह्या दोन श्लोकांत ब्रह्मज्ञ जीवाचें वर्णन आहे आणि तो ब्रह्मज्ञ जीवहि ब्रह्मच असें म्हटलें आहे. एकूण ३ ते ५ ह्या तीन श्लोकांत, "ऋतं पिबंतौ" इत्यादि श्लोकांत निर्दिष्ट केलेलीं ब्रह्माचीं दोन रूपें म्हणजे मूलरूप आणि अत्यंत विकसित रूप हीं वर्णिलीं आहेत. चवथ्या श्लोकांतील "विभु" शब्दाचें स्पष्टीकरण करण्यासाठीच पांचवा श्लोक लिहिला आहे.

"स्वप्नांतं" "जागरितांतम्" ह्या दोन शब्दांतील "अंत" ह्या शब्दाचा अर्थ स्थान म्हणजेच अवस्था असा आहे. बृहदारण्यक ४।३।१३—१८ येथेहि "अंत" ह्याचा हाच अर्थ आहे.

वल्ली ४ श्लोक ६

यः पूर्वं तपसो जातमद्भ्यः पूर्वमजायत ।
गुहां प्रविश्य तिष्ठंतं यो भूतेषु व्यपश्यत ॥
एतद्वैतत् ॥६॥

अर्थ—ब्रह्माच्या पूर्वीच्या तपापासून पूर्वी पाण्यापासून उत्पन्न झालेला जीव [अद्भ्यः पूर्वमजायत] सर्वभूतांच्या ठिकाणीं गुहेंत प्रवेश करून राहतो हें जो पाहतो [व्यपश्यत] तो देखील तें ब्रह्मच होय ॥६॥ जीवरूपी ब्रह्म जसें माझ्यांत आहे तसेंच दुसऱ्या भूतांतहि आहे असें पाहून जो भूतांशीं अद्वैतबुद्धीने वागतो तो ब्रह्मज्ञ देखील ब्रह्मच होय असा ह्या श्लोकाचा भावार्थ आहे. ह्या श्लोकांत जें ब्रह्मज्ञाचें लक्षण सांगितलें तेंच सर्व उपनिषदांनी ब्रह्मज्ञाचें मुख्य लक्षण मानलें आहे.

छांदोग्य ७।२३–२५; बृहदारण्यक ४।३।२०; मांडुक्य ७ येथील "एकात्मप्रत्ययसारम्" वगैरे पहा.

टिप्पणें –येथे व पुढील श्लोकांत जीवाच्या उत्पत्तीची रीति मुंडक १।१।८ ह्यांत जी आहे तीच आहे असें स्पष्ट दिसतें. फक्त तेथील "अन्न" ह्या ऐवजी येथे "अप्" हा शब्द योजलेला आहे. "अप्" हेंहि एक अन्नच असल्यामुळे अर्थतः त्यांत सर्वच अन्नांचा म्हणजे पृथ्वीचाहि अंतर्भाव करण्यास हरकत नाही.

"भूतेषु" ह्या ठिकाणीं "भूतेभिः" असाच पाठ बहुतेक प्रतींत आहे. एका प्रतींत "भूतेषु" असा पाठ आहे (अडयार प्रत पहा). कोणताहि पाठ घेतला तरी अर्थ बदलत नाही.

अनुक्रमणिका

वल्ली ४ श्लोक ७

या प्राणेन संभवति अदिति देवतामयी ।
गुहां प्रविश्य तिष्ठंती या भूतेषु व्यजायत ॥
एतद्वैतत् ॥७॥

अर्थः—जो देवतारूपी [देवतामयी] आनंदरूपी अन्न खाणारा म्हणजे आनंदप्राप्त्यर्थ झटणारा [अदितिः । अद् म्हणजे खाणें ह्यापासून हा शब्द झाला] जीव प्राणापासून किंवा प्राणासह [प्राणेन] उत्पन्न होतो आणि शरीराच्या गुहेंत प्रवेश करून राहतो तो सर्व भूतांमध्ये उत्पन्न झाला. हा जीव देखील तें ब्रह्मच होय. ।।७।।

टिप्पणेः—"भूतेषु" ह्या ठिकाणीं "भूतेभिः" असा पाठ पुष्कळ प्रतींत आहे. अडयारप्रतींत "भूतेषु" असा पाठ दिला आहे व तोच ग्राह्य दिसतो. श्लोक तीनमध्ये ब्रह्म कोणतें तें जडचोटाने प्रत्यक्ष दाखविलें आहे. श्लोक ४–६ मध्ये ज्ञानसंपन्न व शहाणा जीवहि ब्रह्मच असें सांगितलें. आता ह्या श्लोकांत कोणताहि जीव ब्रह्मच असें सांगितलें आहे.

वल्ली ४ श्लोक ८ः—

अरण्योर्निहितो जातवेदा ।
गर्भ इव सुभृतो गर्भिणीभिः ।
दिवे दिवे ईड्यो जागृवद्भि– ।
र्हविष्मद्भिर्मनुष्येभिरग्निः ॥ एतद्वैतत् ।।८॥

अर्थः—दोन अरणींमध्ये जसा अग्नि ठेवलेला असतो (दोन अरणींच्या घर्षणाने अग्नि उत्पन्न होतो म्हणून अग्नि दोन अरणींच्या मध्ये ठेवला असतो असें म्हटलें आहे) किंवा गर्भिणींनी धारण केलेला जसा अग्नि असतो, तशीच जीवात्म्यांमध्ये दररोज [दिवे दिवे] जिची शहाण्या [जागृवद्भिः] व सदिच्छारूपी हवि धारण करणाऱ्या [हविष्मद्भिः] मनुष्यांनी स्तुति करावी (ईड्यः) म्हणजे सत्कर्मे करून उपासना करावी ती कर्मशक्ति [अग्निः] देखील ब्रह्मच होय. ।।८॥

टिप्पणेः—ह्या श्लोकांत परोक्षवाद आहे हें उघड आहे. परोक्षवादविवरणाने "अग्नि" म्हणजे "कर्म" किंवा "कर्मशक्ति" हें मागे वल्ली १ श्लोक १४–१९ ह्यांच्या विवरणांत "अग्नि" ह्यावरील टिप्पणांत दाखविलेंच आहे.

वल्ली ४ श्लोक ९ः—

यतश्चोदेति सूर्यः अस्तं यत्र च गच्छति ।
तं देवा सर्वे अर्पिताः तदुनात्येति कश्चन॥
एतद्वैतत् ॥९॥

अर्थः—जीवात्मा [सूर्य] जागृत होतांना ज्यांतून निघतो [उदेति] आणि निद्राकालीं ज्यांत लीन होतो [अस्तं गच्छति] आणि सर्व इंद्रियें ज्यावर अवलंबून असतात [अर्पिताः] आणि ज्यापेक्षा कोणीच मोठा नाही, तो प्राणदेखील तें ब्रह्मच होय. ॥९॥

टिप्पणेः—ह्या श्लोकांत परोक्षवाद आहे हें उघड आहे. सूर्य म्हणजे जीवात्मा असा अर्थ येथे घेतला पाहिजे, कारण तोच जागा होतांना प्राणांतून उत्पन्न होतो आणि निजतांना प्राणांमध्ये अस्त पावतो. प्राण हा तर जागृतावस्थेंतहि काम करीत असतोच.

छांदोग्य ३।११ येथेहि जीवात्म्याला आदित्य असें म्हटलें आहे. प्राण सर्वांमध्ये श्रेष्ठ आहे हें छांदोग्य ५।१ येथे, प्रश्नोपनिषद् २ येथे आणि इतरत्रहि वर्णिलें आहे. ह्या श्लोकाचा पूर्वार्ध बृहदारण्यकांत १।५।२३ येथे उद्धृत केला असून तेथे त्याच्या अर्थाचें विवरणहि येथे आम्ही केलें तसेंच केलें आहे.

वल्ली ४ श्लोक १०–११

यदेवेह तदमुत्र यदमुत्र तदन्विह ।
मृत्योः स मृत्युमाप्नोति य इह नानेव पश्यति ॥१०॥
मनसैवेदमाप्तव्यं नेह नानास्ति किंचन ।
मृत्योः स मृत्युमाप्नोति य इह नानेव पश्यति ॥११॥

अर्थः—जें येथे आहे तेंच दुसऱ्या ठिकाणीं [अमुत्र] आहे. जें दुसऱ्या ठिकाणीं आहे, त्यासारखेंच [तदनु] येथेहि आहे. जो ह्या जगांत [इह] अनेक वस्तु [नाना] आहेत ह्या दृष्टीने [इव] पाहतो तो दुःखामागून दुःख [मृत्योः मृत्युं] पावतो ।।१०॥ हा नानात्वाचा अभाव [नेहनानास्ति किंचन] म्हणजे एकत्व किंवा अद्वैत (कांही प्रत्यक्ष दिसत नाही.) तो मनानेच म्हणजे बुद्धीनेच ठरवावा आणि पहावा [आप्तव्यं]. (कारण) जो येथे अनेक वस्तु आहेत असें पाहतो तो दुःखामागून दुःख पावतो. ॥११॥.

टिप्पणें:—बृहदारण्यक २।४।६ येथें नानात्व पाहणाऱ्याला कापतात [परादात्। परादुः] म्हणून नानात्व खोटें असें म्हटलें आहे. त्या वचनास अनुसरून येथे "मृत्यु" ह्याचा अर्थ दुःख असा केला आहे. दुःखाने आयुष्य क्षीण होतें म्हणून "मृत्यु" ह्याचा अर्थ दुःख असा होतो. (उपसंहार प्यारा २८ पहा). शिवाय मरणा-नंतर मरण येतें हें कोणीच मनाने (म्हणजे बुद्धीने) पाहूं शकत नाही. पण दुःखानंतर दुःख येतें हें मात्र कोणीहि मनाने पाहूं शकतो, आणि मनाने पहावें [मनसाआप्तव्यं] असें स्पष्ट म्हटलें असल्यामुळे "मृत्यु" ह्याचा अर्थ "दुःख" असा करणें भागच आहे. एकूण ह्या अकराव्या श्लोकाचा अर्थ असा की नानात्व पाहणारा दुःखी होतो म्हणून नानात्व खोटें. दहाव्या श्लोकांत अद्वैताचें विधान केलें आणि नानात्व पाहिल्याने दुःख होतें असें सांगितलें. आणि अकराव्यांत अद्वैत पाहणें म्हणजे काय व अद्वैत कोणत्या प्रमाणाने सिद्ध होतें, तें सांगितलें आहे. "अद्वैत मनाने पहावें" ह्याचाअर्थ "दुसरी वस्तू दिसत असूनहि ती दुसरी नव्हे असें मानावें" असा आहे; "दुसरी वस्तू दिसूंच नये" असा नाही.

वल्ली ४ श्लोक १२–१३

अंगुष्ठमात्रः पुरुषो मध्य आत्मनि तिष्ठति ।
ईशानो भूतभव्यस्य नततो विजुगुप्सते ॥
एतद्वैतत् ॥१२॥

अंगुष्ठमात्रः पुरुषो ज्योतिरिवाधूमकः ।
ईशानो भूतभव्यस्य स एवाद्य स उश्वः ॥
एतद्वैतत् ॥१३॥

अर्थः—भूतभव्याचा ईश्वर असा हा परमात्मा (ब्रह्म) अंगुष्ठ- मात्र पुरुष म्हणजे जीवात्मा होऊन सर्वांच्याच शरीराच्या मधल्या भागांत [मध्ये आत्मनि आहे म्हणून [ततः] जो कोणास भीत नाही किंवा कोणाचा चद्वेष किंवा तिरस्कार करीत नाही, तो तें ब्रह्मच होय. ॥१२॥ भूतभव्याचा ईश्वर असा हा परमात्माच अंगुष्ठमात्र पुरुष म्हणजे जीव होऊन ब्रह्मज्ञानाने धूमरहित ज्योतीप्रमाणे चकचकीत होतो म्हणजे ज्ञानरूपी प्रकाश देणारा होतो आणि असाच जीव [सएव] कीर्तिरूपाने आज आहेच शिवाय कीर्तिरूपाने उद्याहि आहेच. असा कीर्तिमान् जीवहि ब्रह्मच होय. ॥१३॥

टिप्पणें:—छातींत असलेल्या हृदयाची लांबी मनुष्याच्या आंगठ्याच्या लांबीएवढी असते. आणि ह्या हृदयांतच सर्व शक्ति केंद्रित झालेली असते. म्हणून अंगुष्ठमात्र पुरुष म्हणजे जीव असा अर्थ होतो.

"स एव" म्हणजे मागे वर्णिलेला ब्रह्मज्ञानी व ब्रह्म-ज्ञानाचा प्रसार करणारा जीवच कीर्तिरूपाने शाश्वत राहतो. इतरांचें नांव देखील नष्ट होतें. उदाहरणार्थ, व्यास, याज्ञवल्क्य, उपनिषदांचे कर्ते कीर्तिरूपाने शाश्वतच राहणारे आहेत.

ज्योतिरिवाधूमकः—"ज्योतिम्" हा शब्द नपुंसक-लिंगी असल्यामुळे "अधूमकम्" असा शब्दप्रयोग पाहिजे होता. पण ऋषीने "ज्योतिः" हा पुल्लिंगी शब्द मानून 'अधूमकः" असा प्रयोग केला. श्रीशंकराचार्यांनीहि असेंच मानलें आहे.

वल्ली ४ श्लोक १४–१५

यथोदक दुर्गे वृष्टं पर्वतेषु विधावति ।
एवं धर्मान् पृथक्पश्यंस्तानेवानुविधावति ॥१४॥
यथोदकं शुद्धे शुद्धमासिक्तं तादृगेव भवति ॥
एवं मुनेर्विजानत आत्मा भवति गौतम ॥१५॥

अर्थ—ज्याप्रमाणे उंच ठिकाणीं शिखरावर [दुर्गे] पडलेलें पाणी पर्वतावरून [पर्वतेषु] खोल भागाकडे धावत जातें, त्याप्रमाणे ब्रह्माचे धर्म जीवाच्या धर्मांहून भिन्न [पृथक्] आहेत. असें पाहणारा जीव, त्या ब्रह्माच्या धर्मांकडचे धावत जातो, म्हणजे ते ब्रह्माचे धर्म आपणांत आणण्याचा प्रयत्न करतो. ब्रह्म हें वासनारहित शांत आहे तसाच होण्याचा तो शहाणा जीव प्रयत्न करतो. ब्रह्म हें सर्व शरीरांत सारखेंच आहे व सर्व जीवांशीं सारखेंच वागतें. त्याप्रमाणे तो जीव स्वतःशीं व इतरांशीं सारखाच वागतो. ॥१४॥ अशा ह्या विचार करणाऱ्या [मुनेः] शहाण्या जीवाचा [विजानतः] आत्मा, शुद्ध पाण्यांत शुद्ध पाणी मिळवावें त्याप्रमाणे होतो म्हणजे असा जीव शुद्ध ब्रह्मच होतो असा भाव आहे. ॥१५॥ शहाण्या जीवाला ब्रह्म कां म्हटलें ह्याचें कारण ह्या श्लोकांत सांगितलें आहे.

वल्ली पांचवी

वल्ली ५ श्लोक १

पुरमेकादशद्वारं अजस्यावक्रचेतसः ।
अनुष्ठाय न शोचति विमुक्तश्च विमुच्यते ॥
एतद्वैतत् ॥१॥

अर्थः—जन्मरहित [अजस्य] आणि वल्ली ४ श्लोक १–२ ह्यांत वर्णिल्याप्रमाणे पराङ् म्हणजे बाह्य विषयांकडे पाहणारें असें जें चित्त तेंच ज्याला नाही असें [अवक्रचेतसः] जें ब्रह्म त्याच्या अकरा दरवाज्यांच्या शहरांत म्हणजे शरीरांत त्या ब्रह्माजवळ राहून [अनुष्ठाय] म्हणजे ब्रह्माचे गुण आपणांमध्ये आणल्यामुळे जो शोक करीत नाही आणि त्यामुळे शरीरापासून मुक्त होतांच म्हणजे मृत्यु पावतांच [विमुक्तश्च] जन्ममरणाच्या फेऱ्यांतूनहि मुक्त होतो, तो शहाणा जीवहि तें ब्रह्मच होय ॥१॥

टिप्पणेः—"अवक्रचेतसः"—"वक्रगति" म्हणजे "उलट गति" हा अर्थ ज्योतिषशास्त्रांत प्रसिद्ध आहे. तदनुसार येथे आत्म्यासंबंधाने बोलतांना "वक्र" ह्याचा अर्थ "बाह्य विषयांकडे" असा होतो. कारण आंत स्वतःकडे पाहणें ही आत्म्याची स्वाभाविक गति होय आणि "बाहेर विषयांकडे पाहणें" ही उलट गति होय. असें बाह्य विषयांकडे पाहणें, हा चित्ताचा स्वभावधर्म आहे. हें चित्तच ज्याला नाही तें, असा "अवक्रचेतसः" ह्या सामासिक शब्दाचा अर्थ आहे. म्हणजे चित्तरहित, ज्ञाताज्ञेय आणि ज्ञान ही त्रिपुटी ज्याला नाही तें,अहंकाररहित असा अर्थ आहे.

"एकादशद्वारम्"—दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुडया, एक तोंड, एक गुद, एक मूत्रद्वार, एक नाभि आणि एक टाळूच्या ठिकाणचें ब्रह्मरंध्र अशीं अकरा द्वारें होतात.

"अनुष्ठाय"—ह्याचा अर्थ जवळ राहणें असा आहे, "करणें" असा अर्थ नाही. मनुस्मृति अ. ११ श्लोक १११ येथे "तिष्ठंतीष्वनु तिष्ठेत्तु" ह्या वाक्यांत जवळ राहणें हाच अर्थ आहे. "जवळ राहणें" म्हणजे काय तें वर अर्थामध्ये दाखविलेंच आहे. श्रीशंकराचार्यांनी "अनुष्ठाय" म्हणजे "ध्यात्वा" असा अर्थ केला आहे. ह्याचा अर्थ ब्रह्माच्या गुणांचें चिंतन करणें असा जरी असला तरी त्यांत त्या गुणांचें अनुकरण करणें ह्याचाहि अंतर्भाव करणें आवश्यक आहे.

वल्ली ५ श्लोक २

हंसः शुचिषद् वसुरंतरीक्षसत् ।
होता वेदिषदतिथिर्दुरोणसत् ॥
नृषद्वरसदृतसद्व्योमसदब्जा ।
गोजा ऋतजा अद्रिजा ऋतं बृहत् ॥२॥

अर्थः—प्रकाशमान अशा [शुचि] द्युलोकांत राहणारा [शुचिषद्] सूर्य [हंस], अंतरिक्षांत राहणारा [अंतरीक्षसद्], वायु [वसु], वेदीच्या ठिकाणीं म्हणजे पृथ्वीवर राहणारा होता म्हणजे अग्नि, दुरोण म्हणजे नक्षत्रें ह्यांत राहणारा अतिथि म्हणजे फिरणारा चंद्र, मनुष्यांत राहणारा जीवात्मा, देवांमध्ये राहणारा जीवात्मा, जंगम प्राण्यांत राहणारा [ऋतसद्] जीव, आकाशांत राहणारे जीव [व्योमसत्] म्हणजे पक्षी, पृथ्वींत उत्पन्न होणाऱ्या वनस्पति [गोजा], पाण्यांत उत्पन्न होणारे जीव व लता [अब्जाः], प्रवाहांत म्हणजे नदींत उत्पन्न होणारे जीव [ऋतजा], पर्वतापासून उत्पन्न होणारे दगड [अद्रिजा] हे सर्व वाढणारे किंवा विकसणारे [ऋतम्] ब्रह्मच [बृहत्] होय. ॥२॥

अनुक्रमणिका

मध्यप्रांताच्या इतिहासाचीं साधनें

ग्रामजोशी घराण्यांतील कागदपत्रें

शंकर गोविंद चट्टे

बाबासाहेबांची कैफियत

यादि कैफियेत जेबानी बाबा सा। चिमणा बापूचा बेटा नागपूरवालेचा माहे जून छ २ रोज बृहस्पतवार सन १८२५ इ. स. मरकुम छ १४ शबाल (१) कदीम रघोजी भोसले पुण्याहून आले. चार पिढीचा विस्तार त्यांचे पोटीं.

१ जानोजी भोसले याहचे पोटीं	१ मुधोजी भोसले याचे पोटीं विस्तार
१ नानासाहेब	१ बिबाजी
१ चिमणाबापू	१ साबाजी छेत्तीसगडवाले
१ रघोजी	
३	२
तिघाचे पोटीं विस्तार	बिबाजीचे राणीचें नांव कमलावती राणी
१ नानासाहेब का बेटा आपा सा।	त्याचा विस्तार नाही रघोजीची बेटी
१ चिमणा बापूका बेटा बाबा सा।	१ बनुबाई
० रघोजी बेटा बाळराजा मैत जाला	१ साळुबाई
१ रघोजीचा भाचा गुजाबा हाल नागपुरांत आहे.	बनुबाईचा ल्योक साहेबांनी गादीवर बसविला

रघोजीने चिमणाबापूस जादु करून मारले तेव्हा बाबाचा गर्भ चार महेन्याचा पोटांत होता माये घेऊन पळाली कारण जे जरीपटका मोंगलांनी नेला तेव्हा चिमणाबापू बंगाल्याहून हैद्राबादेस आले. बेगमेस घरून जरिपटका व डंका १ व दोन लाख रुपये घेऊन नागपुरास जाताना गायेलगड गोंडागासून सर करून घेऊन गेले आणि चिमणाबापूनी रघोजीस बोलले की बेटी जाली असतां ठीक जावई येतो. हे जिन कशास म्हटल्यावरून रघोजीने जादु चिमणाबापूस मारोतीचे देवळांत पुजेस गेला तेव्हा मारले. जवळ कोण्ही खजमतगार देखील नव्हता. माहदजी लष्करी हाती जादु केली (मसूर खाजगत) घोडाहि त्याबरोबरच मेला. तेव्हा मायेन पोटांत घेऊन मकसुदाबादेस गेली. तेथे जन्म जाला. बैरागी रतनदास गावाबाहेर मठ आहे. तळयाचे काठी. तेथे सहा वर्षे राहिलो नंतर छेत्तीसगडास आलो. तेथे रामदास बैरागी महंत होता तेथे आठ वर्षे गुजरली. तेथून मातोश्रीस काटबडजवळ आवड प्रगण्यात .....तेथें मातोश्री गिरजाबाई हाल आहेत. तेथे जाचक पुणें प्रांतीचे पिपळगाव सातारे प्रगण्यांत शादी झाली. सासरा धोंडीबा जाचक. चार वर्षे झाली. कबिला मायेजवळ आहे आम्ही महायात्रेस जाऊन बदरिकाश्रम व रामेश्वर केले. बारा वर्षे तीर्थाटन केली नंतर येवल प्र॥ पाटवज येथे एकवरीस राहिलो. नंतर एक महिना जाला मनांत कल्पना आली जे कोण्हे साहेबास भेटून कांही बंदोबस्त करावा म्हणून अवरंगाबादेहून बदनापूरास आलो नंतर जालन्यास येऊन आयाचे मठांत राहिलो नंतर देऊळगावीहून जाफराबादेहून लाखनवाड प्र॥ बाळापूर येथे आलो.

१ बस्तीकार हकमात येक रुपया दिल्ले	८१ दिगरसत पाटलान गहू दिले कैली मणभर

१ सिंदखेडात पा न भेट ८१ बाळापुरींत गहू दिले कैली

एक रुपया दिल्ले ८१ कोण्हेरींत पाटलान गहू मणभर

८३

१ चिचखेड ता आकोल पा. दिल्हे. सदर्हु प्रमाणे दिल्हे ते घेतले असेत.

६ समागमे आदमी होते

१ खजमतदार घेटपासून नामे रामा

६ बाळापुरचे कुनबी

१ देशमुख सुकदेव

४ शिवाय आदमी

५

६ पेस्तरची खून मुत्सद्दी वगैरे

(१) विठ्ठलपंत सुभेदार त्याचे ल्योक गणपतराव सुभेदार पातुरी.

(१) भवानी काळूचा ल्योक यशवंतरावजी दिवाण नागपुरांत

१ कोठीवाला नागोजंत नागपुरीं

(१) धर्माजी भोसले कामदार

(१) चिटणीस गंगाधर बापु

१ रामाजी रोडे

६

रघोजी बाबाचे कबिले ३

(१) बाकाबाई वडील नागपुरी कामावर बहाल आहे. आमची आई

१ रघोजी बाबाचे कबिले

(१) पार्वतीबाई राणी

१ ठकुबाई

३

१ आपासाहेबाची माय मैनाबाई आहे किंवा नाही मालूम नाही.

(१) हे पहिलें वर्तमान मातोश्रीचे जबानी माहिती. आपण कांहीं नागपुरीं नांदलो नाही अगर राज्यहि केले नाही आणि हालचा वाका आपणास या शिवाय मालूम नाही.

गाही आंबसरी हवालदार का५ पटील मफेस्ट नोकरी मेळघाट छावनी इंगोली

३

पांचगावच्या लढाई संबंधी दोन पत्रें

श्री सीताकान्त

राजेश्री भवानी काळो गोसावी यासी दंडवत उपरी तुम्ही सरकार पदरची माणसे. वैकुंठवासी बावासाहेबाचे वेळेस कामेकाजे केली. शेवटी लढाईचे वेळेस निमकहलालीची शर्त केली परंतु ईश्वरापासून आयुर्मर्यादि नेम होता त्याप्रमाणे नानासाहेब वैकुंठवासी झाले याजवरोन तुम्ही उदिग्न हवालदिल होऊन घरी बसला त्यास तुम्ही विश्वासुक माणसे आणि या दौलतींत निस्सीमपणे वागत आला तेव्हा पुढेहि सरकारकामाचे उपयोगी हे समजोन चिरंजीव राजेश्री रघोजी भोसले सेनासाहेब सुभा यास आज्ञा करण्यांत आली आंहे. त्याप्रमाणे चिरंजीव तुम्हास लिहितील त्या आज्ञेनुसार तुम्ही कोणतेहि गोष्टींचा आंदेशा व संशये न करता सरकार चाकरींत येऊन दिवाणगिरीचे काम करून रहावे आणि जैसे बाबासाहेब व नानासाहेब यांचे ठी चिरंजीवास समजोन पूर्वीपासोन सेवा करीत आला त्याप्रमाणे करावी. नेमणूक वगैरेचा बंदोबस्त इत्यादिक चिरंजीवाचे आज्ञेवरोन समजेल जाणीजे छ २५ माहे शवाल बहुत काय लिहिणे. मोर्तबखुद

पैवस्ती छ ३ माहे जिल्काद सन ११८४


(२)

श्री लक्ष्मीकांत

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजेश्री भवानी काळो गोसावी यासी स्ने॥ रघोजी भोसले सेनासाहेब सुभा दंडवत उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणे. विशेष तुम्ही सरकार

पदरची माणसें. वैकुंठवासी बाबासाहेब व वैकुंठवासी नानासाहेब यांचे वेळेपासून वागत आला आहात. सांप्रत नानासाहेब लढाईत देवाज्ञा झाली. सबब तुम्ही उदास होऊन घरीं बसला त्यास तीर्थरुप राजेश्री आपासाहेब यांचे पाहण्यांत तुमची वर्तणुक पूर्वीपासोन तुम्ही ज्यापासी राहिला त्याची सेवा निष्ठेने करीत आला. याजवरोन तुमची जागा तीर्थरूपाचे पोटीं हें समजोन तुम्ही जुनी माणसे या दौलती वागला तेव्हा आताही येथेच असावे. सबब वडिलांनी आज्ञा केली याजवरोन ही आज्ञा तुम्हास सादर करण्यांत आली असे. त्यास तुम्ही कोणताहि अंदेशा आपले मनांत न ठेवतां आज्ञेप्रमाणें यावयाचे करणे याविषयी वडिलांनी तुम्हास आज्ञापत्र सादर केले आहे. त्यास जैसे पूर्वी उभयताहि वैकुंठवासी-पासी इमाने इतबारे वागून सर्वत्रास राजी राखीत आला त्याप्रमाणें आतां येथें सरकारांत येऊन दिवाणगिरीचे काम करून रहावे तुमचे बंदोवस्ताकरितां वडिलांनी आज्ञा केली. त्याप्रमाणे सालियाना दहा हजार रुपये. व देणगी वगैरे मामुलीप्रमाणे तुम्हास वंशपरंपरा मिळत जाईल यांत अंतर पडणार नाही. तुम्ही येऊन सरकारपासी हजर होऊन कामेकाजे करावी जाणीजे छ २५ माहे शवाल बहुत काय लिहिणे. मोर्तबसुद

पैवस्ती छ ३ माहे जिल्काद



पेशवे–भोसले भेटीचा पोवाडा

(हा पोवाडा श्रीमंत दादासाहेब काळु यांच्या संग्रहांतील असून तो मी सुमारें ११ वर्षांपूर्वी ऐतिहासिक पोवाडे खंड ३ मध्ये प्रसिद्ध केला. त्यांत वर्णन केलेल्या घटना व उल्लेख सत्य असल्याचें अन्य ऐतिहासिक कागदपत्रांवरून दिसून येतें. काळु घराण्यांतील कागदपत्रांत हा महत्वाचा दस्तऐवज असल्यामुळे या घराण्यांतील कागदपत्रावरोबर तो पुन्हा प्रसिद्ध करीत आहें.)

(शाहीर निंबाजी)

श्रीमंत पंतप्रधान उभेतां भेटी ।
होताच हर्षली धरा झाली सुखवृष्टि ।।ध्रु।।

मुक्काम फणींद्र पुराहून महाराज श्रीमंत ।
सुमुहुर्ते डेरे दिघले संगमावरतं

आपण निघाले बाहेर सवे हुजरात ।
आणि भले सरदार लोक नामांकित

नानासाहेब मातुश्री कुटुंबासहित ।
बाबासाहेब आणि आबा भवानीपंत

दरकूच मग उमरावतीवर मुक्काम केला
चौ रोजमध्ये राजें मतलब उगविला
कुल रोजमुजरे झाडून दिवले लोकाला
गावीलची बंदोवस्ती किल्लेदाराला
राजारामपंताचे स्वाधीन केला
कुल समुदाय सर्वांशी निरोप दिला

कुल दैवत मातुश्रीचे पदीं घाली मिठी ।
म्हणे विजयी होऊन यावे अखंड दृष्टि ।।१।।

बहुराजनीति सांगोन नानासाहेबा ।
सह–कुटुंबा विदा केले आत्मजें बाबा

सह मुख्य विचारुनि असे भवानी आबा ।
दर मजल निघाले सेनासाहेब सुभा

मुक्काम जाउनि वाशमीं केला मनसुबा ।
पलटण वेनीसिंगाचे स्वाधीन अरबा

कुल मुखत्यारी महमद अली ।
मोहऱ्याची डावी बाजू त्यास नेमिली ।
विठ्ठल सुभ्यास जलद सांडणी गेली ।
सैन्यास येऊन भेटला खुशाली झाली ।

बहु गौरवून दिलभरीची वस्त्रें दिलीं।
आघाडीस दरकुचाची आज्ञा केली।
गाईकवाडी गंगाथडीस धाडी चिठी।
तुम्ही वसूल करावे सब कुल वारा हत्ती।।२।।

दररोज हजरी सुरु चालते स्वारी।
तेथे पांडुरंग दादाची खबरदारी।
कुल गणती फौज साठ सहस्र स्वारी।
तेथ कारखाने महाराजा बरोबरी
सवे नामी लोक सरदार मोठे अधिकारी।
त्याहाची नामें म्या सांगावी कोठवरी
बरे असो जी ऐका जी महम्मद अमीरखान
किती खानदान सय्यद मोगल पठाण
यावरी रिसाले नामें कोण कोण
तो गुजर कुसाजी सर्वा बहु सन्मान
रघुपत वक्षी बापु संगीन
सावतखानाचे लोक अति तीक्ष्ण
जरि पटक्या संगे-जमाव झाली दाटी।
हुजरात लोक मोठे पागेचे हट्टी।।३।।

हत्तीवर अंबारीमध्यें गुजाबादादा
त्या मागे चालवी शावुतीनें हौदा
सवे गुजर महादजी आप्तलोका सुद्धा।
वाणाच्या कैच्या पुढें धरून मर्यादा
मागे स्वारी श्रीमंत चालवी विरुदा
पुढे वारेदार जिलवेसी नेमिला हुद्दा।।
डाकेवर बातमी पंत प्रधानाची
पत्रावर पत्रें येती आस भेटीची।
मग जलद निघाली स्वारी श्रीमंताची
गंगेवर योग साधिला संधि ग्रहणाची
दरमजल कडेवर आलि नेमिली प्राची
स्वांगे बंदोवस्ती केली फौजेची

अरब जरब मोहऱ्यास फलटण मोठी
शुभ तिथि विचारून दिले सुदिन शेवटी।।४।।

नाना फडणीस चालून दर्शना आला।
श्रीमंत करी हो सन्मान गौरवे त्याला
दिसे वस्त्रभूषण मग बसूनि विचार केला।
शनिवारीं एकादशी नेम भेटीला
सठी स्वारी तयार झाली भले हो लाला।
हत्तीवर अंबारी बसवी सर्वाला
सवे गुजर महाडिक अहेरराव
साळुंके पालकर शिर्के मुकुटराव
घाडगे पारणकर नामी उमराव
पत्री पठाण इकडे सिंदे खंडेराव
विठ्ठलासी ताकीद केली तयार व्हावें
कुळ मराठ मंडळी स्वारी घेऊन यावें
पऱ्ह्यानी फौजा उभ्या दर्शनासाठी।
उभैता मिळाली सैन्ये झाली दाटी।।५।।

तऱ्हेदार पिवळ्या अंबारी मध्ये श्रीमंत।
तिकडे चमके ओऱ्यात (हौद्यांत?) प्रधानपंत
गज उभे सैन्यामाजी स्थिर मिरवत।
हौद्यासी हौदा भिडे पुढे हुजरात
उतरले दोघे महाराज छबिन्यावरत।
कंठाकंठ मिळविती आनंदभरित
त्या हर्षे सुटल्या सरबत्ती धुंद गगना
आनंदी मानकरी देती सन्माना
दक्षिण देशी मसलती एक फडणवीस नाना
तो सेनासाहेब नानास करी प्रार्थना
आज मोगल करावा जेर अशी वासना
उभैता सैन्यासह गेले स्वस्थाना
पुढे युद्ध होईल घनघोर हा भास पोटी।
निवाजी विनंती करी कर जोडुनि पोटीं।।६।।

अनुक्रमणिका



विदर्भ साहित्य संघाचे भूतपूर्व अध्यक्ष

कै. श्री. हरि नारायण नेने

अनुक्रमणिका

कै. हरिभाऊ नेने

द. रा. गोमकाळे

कै. हरिभाऊ नेने यांना स्वर्गलोकांत जाऊन आता एक वर्षाच्यावर काळ लोटला आहे. परंतु विदर्भ साहित्य मंदिरांत पाऊल ठेवतांच त्या मंदिराचा प्रत्येक कोना कोपरा त्यांच्या स्मृतींनी भरलेला आढळतो. आणि निस्वार्थ, निरक्षेप, निगर्वी, उत्साही व उज्ज्वल चरित्राच्या या आमच्या हरीभाऊंच्या स्मृतीने अंतःकरण भारावून जातें. जन्म आणि मृत्यु हा मनुष्यजीवनांत नियतीचा नित्याचा खेळ असला, तरी कधी कधी तिचा निर्घृणपणा आपल्याला जाणवत नाही, असें थोडेंच आहे. विदर्भ साहित्य संघाचा गतेतिहास नजरेस आणला म्हणजे धारातीर्थी मरण पावल्याचें वीरोचित असें हरिभाऊंचें देहावसान झालें आहे. मृत्यूचे पाश त्यांच्या मानेभोवती आवळले जाईपर्यंत हरिभाऊ निर्धाराने संघाचें कार्य करीत होते. त्यासाठी त्यांनी आपल्या प्रकृतीला यत्किंचित जपलें नाही. परंतु त्यामुळे संघाच्या जीवनांत पारलौकिक अर्थाने ते चिरंजीव झाले असले तरी नेमकी तीच गोष्ट हरीभाऊंच्या मित्र–परिवारांच्या अंतःकरणाचा वेध करून जाते. जगण्यासारखें जीवांत जोपर्यंत आहे तोपर्यंतच मरणांत मौज आहे. हें खरें. पण ती मौज कुणाला ? तें जाणाऱ्यांचें भाग्य आहे. परंतु संस्थाजीवन जगणाऱ्या पुरुषाचें तें मरण संस्थेच्या जीवनाला फार मोठा आघात करतें. एक वर्षानंतरहि आमचें मन हरीभाऊंच्या आठवणीने जें दुःखव्याप्त होतें, तें त्यांच्यावरील प्रेमाइतकेंच या आमच्या संस्थेच्या जीवनावर झालेल्या आघातामुळे !

हरीभाऊ आणि मी आमच्या दोघांच्या वयांत पिता–पुत्राइतकें अंतर होतें. आपल्या निरलस व मोकळया स्वभावामुळे, तपस्याला शोभेल अशा साहित्य व इतिहासाच्या अभ्यासामुळे, पांडित्यामुळे ज्यावेळीं हरिभाऊ अखिल महाराष्ट्रांत ख्यातनाम होते त्यावेळीं आम्ही देवनागरी लिपीची अक्षर ओळख करून घेण्यासाठी शाळेंत जात होतो. 'अभिनव नाटय मंदिरा'चा सदस्य या नात्याने सुमारें २० वर्षांपूर्वी त्यांचा माझा परिचय झाला. त्यांच्याकडे पाहिलें असतां या एरवीं रूपसौंदर्य नसलेल्या व कांहीशी बेडौल शरीरयष्टि असलेल्या पुरुषांत प्रकर्षाने रसिकता असेल, नाटयगुण असतील व वयाच्या उतरणीला लागूं पाहत असतांनाहि 'सहकारी संस्थेच्या' 'कीचक वधा'च्या प्रयोगांत आत्मविश्वासाने 'सैरंध्री'ची भूमिका करण्याच त्यांनी धाडस केलें असेल ही गोष्ट हरिभाऊंना केवळ दुरूनच पाहिलेल्या व्यक्तींना कधीहि खरी वाटण्यासारखी नाही. पण ती गोष्ट त्यांनी यशस्वी करून दाखविली हें सत्य आहे. हरिभाऊंचा धीर गंभीर चेहरा अपरिचितांनी पाहिला तर त्यांचें हें बाह्य स्वरूप व प्रथमदर्शनीं आढळणारी गंभीरता म्हणजे आंतील त्यांच्या आंतरिक सौंदर्याला तात्पुरतें आवरण घालणारें पातळ वस्त्र आहे याची जाणीव ओळखीच्या जाणिवेने–आत्मीयतेने त्यांचे डोळे एखाद्या मित्राकडे वळले व ओठाच्या पाकळया मंदस्मिताने हालूं लागल्या, की पटकन व्हावयाची व पहिल्या परिचयांत निसर्गतः नसणारा थोडा संयमाचा काळ क्षणा दोन क्षणांत ओसरला म्हणजे हरिभाऊंच्या आणि आपल्या वयांतील अंतर त्यांच्या आबालवृद्ध मित्रांच्या सहवासांत यत्किंचितहि कधी जाणवत नसे. त्यांच्या वृत्तींतील हा निरागस बालसुलभ मोकळेपणा त्यांनी आपला शेवटचा निःश्वास सोडून या जगाचा निरोप घेतला त्या क्षणापर्यंत तसाच ताजातवाना होता.

हरीभाऊंच्या या गुणाची जाणीव त्यांच्या मित्रांना पूर्णतः होती. वास्तविक हरिभाऊ म्हणजे विद्वज्जड पंडित. त्यांचा महानुभावपंथाच्या वाङ्मयाचा–व्यासंग, त्या पंथा-

संबंधीचें त्यांचें संशोधन कार्य, मनन, वाचन इत्यादि संसार पाहिला म्हणजे अशा लोकांच्या बाबतींत सामान्यतः आढळणारा माणूसघाणेपणा अन्य गोष्टींबद्दलचा तिऱ्हाईत-पणा व उपेक्षाबुद्धि यांचाच प्रत्यय त्यांच्या सहवासांत यावयास पाहिजे होता. परंतु हरीभाऊंचें व्यक्तिमत्व या सामान्य अनुभवाला अपवादरूप होतें. या जगांत वावर-तांना त्यांना निरनिराळ्या क्षेत्रांत जीं कार्यें करावयाचीं होतीं, त्या प्रत्येक भूमिकेंत ते सहृदय रसिकतेने, तळमळीने व निर्धाराने एकरूप होत असतें व त्यांत ते यशस्वीहि होत गेले.

त्यांचा निगर्वीपणा व कार्याबद्दलची तळमळ व कोणतेंहि काम करण्यांत कमीपणा न वाटणारी मनोवृत्ति खरोखरच आदर्श होती. अभिनव नाट्य मंदिरातर्फे होणाऱ्या नाट्य-प्रयोगाच्या वेळीं नटांना चहा–कॉफी पुरविण्याचें, त्यांच्या पासेसचा हिशेब ठेवण्याचें कामहि तें आत्मीयतेने व निष्ठेने करीत असत. हरीभाऊंच्या सहवासांत काम करीत असतांना रागलोभाचे प्रसंग येत नसत असें नाहीं. परंतु हरीभाऊंच्या पुढे जातांच त्यांचा हासरा चेहरा पाहतांच रागाची अक्षरशः वाफ होत असे; त्याचा मागमूसहि उरत नसे व त्याचें पर्यवसान लोभांत होत असे.

हरीभाऊंचा विदर्भ साहित्य संघाशीं संबंध आला त्या दिवसापासून संघाच्या जोपासनेसाटी एखाद्या आघाडीवरील सैनिकाप्रमाणे त्यांनी कष्ट सोसले. अध्यक्ष-पदीं विराजमान झाल्यावरहि त्यांनी आपली ती भूमिका कधीच सोडली नाही. यांतच हरीभाऊंचें अलौकिक व्यक्तिमत्व प्रत्येकाला आढळून आलें, अशा या माझ्या वडीलधाऱ्या मित्राला, व्यासंगी पंडिताला, रसिक साहि-त्यिकाला, निष्काम निरपेक्ष कार्यकर्त्याला आजच्या या प्रसंगीं अत्यंत भक्तिभावपूर्ण श्रद्धांजलि अर्पण करण्या-पेक्षा आणखी मी काय करूं शकतों ?

क वि ता

नावीन्याची आस !

कांही तरी नाविन्याला
मन माझें आसावलें
त्याच रूढ जीवनाला
मन आता उबगलें

त्याच शिळया प्रणयाने
उषेच्या आणि रवीच्या
फुटे रक्तिमा कपोलीं
त्याच लज्जित उषेच्या

रूक्ष निःशब्द मध्यान्हीं
करपून सृष्टि जाते
सूर्यास्तीं गुलाबी स्मित
तिच्या ओठीं रेंगाळतें

निःशब्द विश्रब्ध रात्र
चराचरां घेते कुशीं
शीत चंदेरी दुलई
ओढी वरी मृदुलशी

पुन्हा तीच परम्परा
कधी होई ना खंडित
मन जाई कंटाळून
स्फूर्ति होऊन कुंठित

वाटे होऊन प्रलय
धरा जावी थरकून
आणि तिला मिळावया
उफाळावा जलाशय

व्हावा नाश या पृथ्वीचा
आपणहि नष्ट व्हावें
तोच तोच रूक्षपणा
विसरण्या जीवनाचा

सृष्टीची पुनरुत्पत्ति
होईल कालांतराने
तेव्हा यावें पुनः जन्मा
अन् जगावें नवतेने

—अनघा

बुजरी

माझ्या मनाची रे मनी
असे भारीच बुजरी,
तुझी बघून सावली
दचकली सशापरी !

अंग चोरुनी आपुलें
उभी दूर रे राहिली
हात तुझा हळुवार
फिरतांच शहारली !

घेतां वक्षीं उचलून
भारी भारी संकोचली
उतरायास खालती
आणि ओढही घेतली !

—पण बावरी ही आता
जरी जाहली ओढाळ
तुझी पाहते वाटुली
रोज सांज नि सकाळ—

वेडी लाजरी बावरी
मनी मनची अजून
येतां छायेची चाहूल
पळे दिठीसमोरून !

—निशिकांत करकरे

हातीं पाळण्याची दोरी

तुझ्या इवल्या डोळ्यांत
अमृताचा गोड झरा
माझें हरपलें सुख
आलें परतून घरा !

तुझ्या मौनांतून मला
आज सारें उमगतें
तुझ्या हास्यांतून माझें
भाव-सुम उमलतें !

शब्दावीण, अर्थावीण
तुझे सारे हावभाव
माझ्या मनाच्या शिंपेंत
स्वाती-जलाचा वर्षाव !

लक्तराची धनीण मी
साताजन्माची भिकारी
आहे पण आता माझ्या
हातीं पाळण्याची दोरी !

—बाबा मोहोड

"तसें तुझें मुखबिंब"

आज पोळ्याची आवस, उद्या सोनुल्याचा सण
तान्ह्या पोळ्यासाठी, बाळ येणार दुरून

रात्र सरता सरेना, कधी होणार पहाट
ये रे ये रे बाळराजा, तुझी पाहतें मी वाट

दूर पांच मैलांवर, तुला धाडलें खासर
शिटी फुंकीत फुंकीत, गेली मेल पॅसेंजर

नाद घुंगुरांचा येई, उभी राहते दिंडींत
नाही थांबली रे गाडी, जाई दुज्या अंगणांत

तुझा बैल शृंगारला, इटी दांडू मी ठेवले
छान नवीन नवीन, तुला गलोल आणले

निळ्या रंगाची मोटर, आता पाराशीं थांबली
उगवतीकडे तशी, उषादेवी ही हासली

बचके एवढें सूर्यबिंब, आलें जगा उजळीत
तसें तुझें मुखबिंब, आलें घरा उजळत

—सौ. सरस्वती सुभेदार

नवें नातें

आता मोहरल्या क्षणा
तुझी झडूं न दे कांती
मला अजुनी आठवे
क्षणकालता तेव्हाची

तेव्हा स्वप्नांचें चांदणें
होतें घरेवर आलें
आणि चोरलेल्या क्षणीं
माझें मोपण सांडलें

तेव्हा मृत्तिकेचा गंध
होता भिजला धारेंत
आणि न्हालें रे सचैल
खपुष्पांच्या (?) गंधांत

पाहा आकाश धरेचें
झालें अंतर धूसर
आता आर्ततेचा किती
इथे लागें शुद्ध-स्वर

जरी काळाचीं पाऊलें
गेलीं वेगानें वाजत
गातों पावलोपावलीं
नव्या जीवनाचें गीत

आता मोहरल्या क्षणा
माझें नवीनच नातें
माझी नवीनच माती
नवें हिरवेंच पातें

—वामन इंगळे

विनोबा विचारपद्धति एक समीक्षा

वैकुंठ इंगळे, काटोल

पू. विनोबाजींच्या भाषणांचे येणारे अहवाल, त्यांच्या प्रेषकांनी मधूनमधून त्यांच्या व्यक्तित्वाविषयी–विचारपद्धतीविषयी व एकंदर कार्याविषयी लिहिलेले लेख मुख्यतः नागपूरच्या तरुणभारतांतून आणि महाराष्ट्रांतून वाचण्यांत येतात. या आणि पुस्तकरूपाने प्रगट झालेल्या विनोबांविषयीच्या लिखाणाच्या आधाराने विनोबांविषयी कांही विवेचन विशेषांकाकरिता मांडित आहे. विनोबांच्या विचारसरणीचा प्रतिवाद करणारे लेखहि स्वागतार्ह ठरतील अशी जी घोषणा युगवाणीच्या सन्मान्य संपादकानी केली, त्या घोषणेमुळे हा लेख प्रकाशनार्थ धाडण्याची मला स्फूर्ति झाली.

"हुकूमशाही कोणतीहि वाईटच. म्हणून कामगारांची हुकूमशाही सुद्धा त्याज्यच" अशा आशयाचा विचार त्यांनी आपल्या एका भाषणांतून मांडला. (२७–८–५३ तरुण भारत.) याच भाषणांत कम्युनिस्टांचें हृदयपरिवर्तन करण्याचा मनोदयहि त्यांनी बोलून दाखविला. विशेषतः भूदानाची चळवळ आरंभल्यापासून विनोबाजी कम्युनिझमवर, कम्युनिस्टांच्या चळवळीवर तुटक तुटक रीतीने मतें व्यक्त करतात. कम्युनिझम ही समग्र विचारसरणी डोळ्यासमोर ठेऊन तिचा साकल्याने परामर्ष घेत नाहीत. यामुळे एकंदर विचारसरणीला फार अन्याय होतो. तिचा एक लहानसा भाग संपूर्ण विचारसरणीपासून अलग काढल्यामुळे ती विचारसरणी लोकांसमोर विपर्यस्त स्वरूपांत मांडली जाते. इतकेंच नव्हे तर माझा विनोबाजींवरील मुख्य आक्षेप हा की त्यांची विचारसरणीच अत्यंत सदोष, बुद्धिवादविरोधी आणि व्यक्तिमाहात्म्य व अंधश्रद्धा यांच्या मिश्रणांत बुचकळून काढलेली आहे. तें कसें याचाच प्रपंच प्रस्तुत लेखांत करीत आहें.

कम्युनिझम विचार करण्याच्या लायकीचाच नाही

इतर विचारसरणींचा जसा सर्वांगीण अभ्यास श्रद्धेय विनोबाजींनी केला असेल, तसा त्यांनी कम्युनिझमचा केलेला नाही. याला आधार खालील प्रमाणे. कम्युनिझमच्या मूलभूत कृती विनोबाजींनी पूर्णतः वाचलेल्या नाहीत, हें त्यांनीच एका ठिकाणीं मान्य केलेलें आहे. (प्रस्तावना–गांधी ॲन्ड मार्क्स) शिवाय 'गांधी ॲन्ड मार्क्स' या श्री किशोरीलाल मश्रूवाला यांनी लिहिलेल्या पुस्तकाला जोडलेल्या प्रस्तावनेंत पृष्ठ १७ वर विनोबाजींनी असें स्पष्ट म्हटलें आहे, "Communism being obviously an ideology of attachment (asakti) I never considered it worthy of philosophical speculation." (कम्युनिझम ही उघड उघड आसक्तिची विचारसरणी असल्यामुळे; तत्त्वज्ञानात्मक विचार करण्याच्या लायकीची ती मला कधीच वाटली नाही.)

या जगाविषयीचा विचार हें कम्युनिझमचें अनन्य वैशिष्ट्य आहे. विनोबाजी समजतात त्याप्रमाणें तो दोष अथवा तज्जन्य त्रुटि नव्हे. इतर विचारसरणी व कम्युनिझम यांमधला हा तर मौलिक फरकच आहे. 'आसक्त विचारसरणी ही विचार करण्याच्या लायकीचीच नव्हे' या विनोबांच्या धारणेमुळे साहजिकपणेच त्यांच्या याविषयीच्या अभ्यासाला मर्यादा पडल्यात. देशी विचारसरणी व परदेशी विचारसरणी असा भेद 'मानणारा' एक पंथ आपल्या देशांत आहे. परदेशी विचारसरणी ती परदेशी म्हणूनच निषिद्ध असें त्यांचें प्रतिपादन आहे. विनोबांची प्रस्तुत धारणा याच विचाराचें न कळत कां होईना पोषण करते. विचार-

सरणी भारतीय असो की अभारतीय असो; भौतिक जगाविषयीच्याच आसक्तीची असो की अनासक्तीची असो मार्क्सची अर्थप्रेरणा मानणारी असो की फ्रॉइडची कामवादी असो—-मानवजातीच्या हिताच्या दृष्टीने सर्वांगीण परिशीलन करूनच तिचा एक तर स्वीकार करावा लागेल किंवा तिला अव्हेरावें लागेल. ' एखादी विचारसरणी आसक्तीची आहे म्हणूनच ती विचार करण्याच्या लायकीची नाही ' असें जाहीर करतां येणार नाही. कारण तें उघडउघड, सर्वंकष विचार-मंथन करण्याच्या दृष्टीने मारक व बुद्धिविरोधी ठरेल. परब्रह्म, परलोक, मोक्ष इत्यादि कल्पना मनोराज्यवादी आहेत (utopian). त्यांचा भौतिकसृष्टीशीं नुसता संबंध आणल्यामुळे या गोष्टी देशांतील बहुसंख्य कामगार व किसान यांच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय गुलामगिरीला कारणीभूत झाल्या आहेत, अशी मांडणीच इतिहासाच्या अवलोकनाने कम्युनिस्ट विचारवंतांनी केलेली आहे. शिवाय अध्यात्म, धर्म, नीतिमत्ता यांचा परामर्श कम्युनिस्टांनी घेतला नाही असें नाही. त्यांच्या वाङ्मयांतील संबंधित उतारा असा. Spiritually an external or ceremonial religion is good for nothing. Materially it has failed to stop the strong man from exploiting his weaker brother; as for its scientific side, it has developed those traits in man which are anti-social and anti-scientific. As for its aesthetic and metaphysical speculations, it can be fostered by literature and art, morality and social service and a living faith in the human brotherhood.

आध्यामिक दृष्टया पाहिलें तर बाह्य आणि कर्मकांडप्रधान धर्म निरर्थक ठरतो. भौतिक दृष्टया पाहिलें तर असें दिसून येतें की आपल्या कमजोर बांधवाचें होणारें शोषण धर्म थांबवूं शकला नाही. धर्मानें मनुष्यांत असामाजिक आणि अशास्त्रीय प्रवृत्ति वाढीला लावलेली आहे. आणि अध्यात्म विचार खरोखर कोणी वाढीला लावलेला असेल आणि लावीत असेल तर आजची कला आणि वाङ्मय, समाजसेवा आणि नीतिमत्ता आणि मानवी बंधुत्वा-वरची ज्वलंत श्रद्धा यांनीच वाढीला लावलेला आहे.

उपरोक्त परिच्छेदांतील विचारांचें 'वस्तुनिष्ठ दृष्टीने,' कल्पनावाद्यांना, तथाकथित चैतन्यवाद्यांना आणि धर्मवाद्यांना खंडन करणें केवळ अशक्य आहे. कारण धर्माने मानवा मानवांत लावलेलें वितुष्ट-संकीर्ण विचारांचें काढलेलें पीक, प्रगतीला खीळ घालणाऱ्या अंधश्रद्धांचें निर्माण केलेलें प्राबल्य हें आज सूर्यप्रकाशा-इतकें स्पष्ट आहे. असें असतांना कम्युनिझममध्ये सदर भ्रामक मूल्याचा समावेश नाही म्हणून कम्युनिझम विचार करण्यांच्या लायकीचाच नाही असें म्हणणें हें कितपत न्यायसंगत व बुद्धिवादाचें होईल ?

सदोष विचारपद्धतीचा दुसरा मासला

श्री मश्रूवाला यांच्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याच्या निमित्ताने विनोबांनी या विषयाचें अत्यंत धावतें आणि निसटतें समालोचन केलेलें असून कम्युनिझम विषयी मतें ठोकलेलीं आहेत. आपल्या मतांना विनोबांनी भरभक्कम आधार तरी द्यावयाला पाहिजे होता. तसा तो त्यांनी दिलेला नाही. आणि म्हणून प्रस्तावनेने तर राहोच, खुद्द मश्रुवाला यांच्या पुस्तकानें सुद्धा—-त्यांनी विनोबाजींच्याच दोषाचें अनु-करण केल्यामुळे चिकित्सक आणि जागरूक वाचकाचें समाधान होत नाही. याच कारणाने विश्वभारती-सारख्या उच्च दर्जाच्या, स्वतंत्र व समतोल धोरणाच्या मासिकांतील विद्वान समीक्षकालासुद्धा आपल्या मताच्या पुष्टचर्य कमींतकमी—अगदी दिला की नाही असा आधार देण्याचें विनोबांच्या विचारपद्धतीचें वैगुण्य तीव्रपणाने जाणवलें. तो लिहितो, "The Promise of excellent beginning given above made by Vinoba in his introduction is not however fulfilled. It is a long introduction covering 34 pages, a third of the Book. Neither Shri

Mashruwala nor Shri Bhave quotes from Marx. The only quotation being a single short sentence contained in a longer extract from Lenin in appendix IV.

Shri Mashruwala attempts to to be more just. But there is no point by point examination of the two creeds. And I do not think that a creed which has brought about at least two great revolutions in Russia and China can be dismissed as lightly as Shri Vinoba would like to dismiss it.

भाषांतर--विनोबांनी प्रस्तावनेची सुरवात मोठी सुंदर केलेली आहे. पण सुरवातीने निर्माण केलेल्या अपेक्षा संपूर्ण प्रस्तावना पूर्ण करीत नाही. पुस्तकाचा ¾ भाग व्यापणारी ही एक लांबलचक प्रस्तावना आहे. श्री मश्रूवाला व विनोबा यांनी लेनिनच्या पुरवणी ४ मधील एकुलत्या एक छोट्या वाक्याशिवाय त्यांचें दुसरें कोणतेंच अवतरण दिलेलें नाही. मश्रूवाला विनोबांपेक्षा जास्ती न्याय करण्याचा प्रयत्न करतात पण दोन दृष्टींची मुद्देसुद छाननी त्यांनीहि केली नाही. मला असें वाटतें की ज्या विचारसरणीनें कमींतकमी दोन महान राज्यक्रांत्या (रशियन आणि चिनी) घडवून आणल्या, त्या विचारसरणीची विनोबा ज्या सहजपणाने व उथळपणाने वासलात लावतात, त्या सहजपणाने ती तशी लावली जाऊं शकत नाही.

विश्वभारतीमधील समीक्षा–नुसतींच मतें

याच प्रकारचें कम्युनिझम या विचारपद्धतीला अन्याय करणारें व साधार नी साधकबाधक चर्चा न करिता दिलेलें तयार व साचेबंद भाषण म्हणजे चांडिलला दिलेलें स्तालिनला श्रद्धांजलि वाहणारें भाषण होय.

" मार्क्स, लेनिन व स्तालिन हे तीन महापुरुष साम्यवादाच्या इतिहासांत एकामागून एक येतात. या तीन व्यक्तींचे विचार बदलत गेलेले पुष्कळ व्यक्ति पाहतात. परंतु विचार जरी बदलले तरी लेनिनच्या अनुभवांत विसंगति दिसून येत नाही. पण स्तालिनच्या बाबतींत मात्र तसा अनुभव येत नाही. मार्क्सच्या विचारांना आकार देण्याचा प्रयोग लेनिन व स्तालिन या उभयतांनी केला. लेनिनचा आचार मार्क्सवादाच्या जवळ दिसतो. म्हणून तो मार्क्सवादाच्या विचारापासून दूर गेलेला दिसत नाही. पण स्तालिनविषयी मात्र तसें म्हणतां येत नाही. त्याने मार्क्सचा विचार कोठच्या कोठे नेला आहे. अर्थात हा इतिहासज्ञांनी विचार करण्याचा विषय आहे. त्याला मार्क्सवादाची ओळखहि असावी असें वाटत नाही. त्याने मार्क्सवादाची उलटपालट करून टाकली आहे. यामुळे अपेक्षेपेक्षा उलटा परिणाम झाला आहे. " (तरुणभारत–नागपूर)

वरील उताऱ्यांत प्रत्येक वाक्यांत विनोबाजींनी तयार मत दिलें आहे. आपल्या मताच्या समर्थनार्थ

कोणताहि प्रत्यक्ष वा सैद्धांतिक आधार संपूर्ण भाषणांत शोधून सापडत नाही. 'लेनिन मार्क्सच्या विचाराच्या जवळ दिसतो, म्हणून तो मार्क्स-वादाच्या विचारापासून दूर गेलेला दिसत नाही' याला कांही प्रमाण तर त्यांनी दिलें नाहीच पण मार्शल स्तालिनने मार्क्सवादांत कोणती उलट-पालट केली व त्याचें प्रतिपादन मार्क्स व लेनिनशीं विसंगत कसें याचीहि थोडीशी सुद्धा फोड त्यांनी केली नाही. इतरत्र वा पुस्तकरूपानें तरी या आपल्या आवडत्या सिद्धांतांची साधार मांडणी विनोबांनी कोठे केली, असा माझा त्यांना सरळ सवाल आहे. असें जर आहे तर विनोबा म्हणतात म्हणूनच हें खरें असें विचार-शक्तीला तिलांजली देऊन मान्य करावयाचें की काय? आपलीं मतें बेधडक ठोकून झाल्यानंतर शेवटीं 'अर्थात् हा इतिहासज्ञांनी विचार करण्याचा विषय आहे' अशी मखलाशी करावयाची ही कोठली विचारपद्धति?

विनोबांची विसंगत विचारपद्धति

विनोबाजींनी खालीलप्रमाणें मांडणी केली आहे. "मानवी समाज ही एकसंध व एकात्म अशी गोष्ट आहे. समाजाचे कम्युनिस्टांप्रमाणें वर्ग कल्पिणें ही मूळांतच चूक गोष्ट आहे. तसें मानणें म्हणजे समा-जाच्या ऐक्यावरच आघात करण्यासारखें आहे. समाज हा परस्पर सहकार्याच्या पायावर उभा आहे—वर्ग-संघर्षाच्या नव्हे."

यानंतरच्या व यापूर्वीच्या अनेक भाषणांतून व पुस्तकांतूनसुद्धा 'वर्गसमन्वयावरची' आपली श्रद्धा विनोबाजींनी बोलून दाखविली आहे. सर्वोदय साहित्यां-तून व खुद्द गांधीजींच्या तोंडून सुद्धा वर्गसमन्वय या शब्दाचा सर्रास वापर झाला आहे व तें प्रत्यक्ष दाख-वितां येण्याजोगेंहि आहे. एकीकडे विनोबा ठासून वर्गाचें अस्तित्व नाकारतात आणि दुसरीकडे वर्ग-समन्वयाच्या मार्गानें वर्गविहीन समाजव्यवस्था घडवून आणण्याचें आपलें उद्दिष्ट वारंवार जाहीर करतात. वर्गसमन्वय की वर्गसंघर्ष हा मुद्दा आपण बाजूला ठेऊं या. पण वरील उद्गारांवरून 'वर्ग अस्तित्वांत आहेत' एवढी वस्तुस्थिति निरपवादपणें सिद्ध होत नाही कां? विनोबाजींच्या मताप्रमाणें वर्गच जर नाहीत तर तुम्ही समन्वय घडवून आणतां कशाचा? असें जाचक प्रश्न उपस्थित होतात. यांचें उत्तर विनोबा काय देणार?

देवभोळ्या, भांबड्या, अंद्धश्रद्ध लोकांवर विनोबांनी केलेला प्रयोग

"माझ्याबरोबर भूदानांत एक बालकसुद्धा फिरत आहे आणि भूदानयज्ञाचा जयजयकार करीत आहे. याचा स्पष्ट अर्थ असा कीं माझी भूदानयज्ञाची चळवळ प्रत्यक्ष परमेश्वराला सुद्धा मानवली आहे." (उत्तरप्रदेशांतील एका भाषणांतला उतारा) "हिंदूंनी यंत्रांचा उपयोग करणें हें गोमांस भक्षण करण्यासारखें आहे. मुसलमानांनी त्याचा वापर करणें डुकरांचें मांस खाण्यागत आहे." (दरभंगा येथील विनोबाजींच्या भाषणांतील उद्गार.)

विनोबांच्या या ताज्या उद्गारांचें आवाहन हें तर्कप्रखर बुद्धीला की अंद्धश्रद्धेला याचा वाचकांनीच निर्णय द्यावा. आपल्या देशांतील लोकमत हें आधीच रूढीवादी, अंद्धश्रद्धाळू व विभूतिपूजक असल्यामुळे ते साहजिकच ते लोकशाही व बुद्धिवाद यांना विरोधी आहे. या सत्याचा पाठपुरावा अनेक विचारवंतांनी केलेला आहे. अशा परिस्थितींत लोकांच्या अंधश्रद्धांचें पोषण करणें आणि व्यक्ति-माहात्म्य वाढविण्याला कारणीभूत होणें म्हणजें निश्चितपणे देशाला दुर्दशेच्या खाईंत लोटण्यासारखें आहे. आणि हें कार्य कळत न कळत कां होईना विनोबांच्या हातून होत आहे. या मार्गाचा अवलंब ज्या 'साध्यसाधन' शुचितेची विनोबा जे नेहमी तरफदारी करीत असतात—त्या चौकटींत बसतोच कसा हें मला कांही केल्या कळत नाही.

विनोबांच्या बोलण्यांतील व लेखनांतील या ठळक दोषांची चर्चा मीं अनेक उदाहरणें देऊन विनोबांच्या एक शिष्या कुमारी विमलताई ठकार यांच्याशीं केली. अनिच्छेने कां होईना त्यांना विनोबांचा हा दोष मान्य करावा लागला. नुसतेंच नव्हे तर माझ्या

मुद्यांना बळकटी आणणारी विनोबांच्या सदोष विवेचन पद्धतीची अनेक उदाहरणें त्यांनी मजजवळ निवेदन केलीं. इतकेंच नव्हे तर विनोबाजींच्या या पद्धतीने एकेवेळी शास्त्रीय समाजवाद मानणाऱ्या श्री जयप्रकाश नारायण सारख्या बुद्धिमंतांचा देखील कसा बळी घेतला, हें दाखविणारें बिहारमधील त्यांच्याच एका भाषणांतील उदाहरण त्यांनी सांगितलें. श्री जयप्रकाश म्हणाले होते; "जे भूदानांत जास्ती जमीन देतील त्यांना स्वर्गांत फार उच्च स्थान मिळेल. जे कमी देतील किंवा देणार नाहीत त्यांना नीच स्थान मिळेल."

उत्तर प्रदेशांत भूदानांत मिळालेली जमीन भुताने पछाडलेली आहे असा प्रवाद जयप्रकाशांच्या कानीं येताच, त्या भुताखेतांचें उच्चाटन करण्याकरिता तेथे यज्ञयागादि कार्य करण्याकरिता बनारसच्या ब्राह्मणांना जयप्रकाशांनी सुचविलें होतें. व भुताखेतांचा उपशम झाल्यानंतरच ती जमीन लागवडींत येणार होती. हें भाषण छापून येतांच दुसरेच दिवशीं डॉ. राममनोहर लोहियांनी जयप्रकाशांचें खंडन कोणत्या व कशा सप्रयोग रीतीने करण्याचें जाहीर केलें होतें हे सूज्ञ वाचक विसरले नसतीलच. 'विनोबांनी आपल्या विचारसरणीची शास्त्रीय मांडणी केली नाही एवढें खरें. तुमच्यासारख्या तरुणांनी समोर येऊन हें कार्य करावें. तर विनोबांचा विचार सुशिक्षितांमध्यें मूळ धरू शकेल' असें शेवटीं विमलताई मला म्हणाल्या.

रूढीवादीत्व, अंधश्रद्धाळूपणा, देवभोळेपणा, धर्मांधता, आणि लोकांच्या मनावर असलेल्या अनेक भ्रमांचा पगडा घालविण्याकरिता लोकशिक्षणाची आवश्यकता आज जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत जोमानें प्रतिपादन करण्यांत येत आहे. अशा वेळीं नेमकें विरोधी कार्य श्री विनोबा आणि त्यांच्या प्रभावानें भरले-ल्यांच्या हातून व्हावें, याबद्दल मन अतिशय उद्विग्न झाल्याशिवाय राहत नाही. अशा शक्ति देशांत काम करीत राहल्यात तर लोकशाही, समाजवाद, व्यक्ति-स्वातंत्र्य, आणि सुबुद्ध नागरिकत्व यांचा या देशांत कधीच विकास होऊं शकणार नाही. आणि म्हणून माझी वर्तमानपत्रकारांना—संपादकांना—राजकारण-समाजकारणाच्या अभ्यासकांना आणि विद्यार्थ्यांना अशी विनंती आहे की विनोबांच्या या विचारपद्धतीचा लोकहितैषी दृष्टीने त्यांनी वरचेवर परामर्ष घ्यावा व या अपप्रवृत्ति पसरण्याचा धोका दिग्दर्शित करावा. विनोबांच्या या अशास्त्रीय विचारपद्धतीचा पराभव एकाच सूत्राचा अवलंब करून केला जाऊं शकतो:

बुद्धिवाद हा झेंडा तुमचा
मिळवा बुद्धि—मिळेल सिद्धी.

शेजारच्या पिंपळाची

शेजारच्या पिंपळाची
काळी सावली भयाण
बिलगून झोपडीला
गाते अपेशाचें गान

पावसाची रीप रीप
कधी भकास हासत
थरथरल्या बांबूंना
भिववित सारी रात

त्याला भरीत हुंकार
सुसाटला पिसा वारा
लववित झोपडीला
सोडे हास्याचा फवारा

आणि तरी उभी तिथे
झोपडी ती मुकाटत (?)
अश्रु नुसते पुशीत
जरी नाही सहावत

—श्रीधर शनवारे

विदर्भ साहित्य संघ

रंगमंदिर निधीला सहाय्य करा

विदर्भ साहित्य संघाने चार वर्षांपूर्वी हातीं घेतलेलें विदर्भ साहित्य मंदिराच्या उभारणीचें काम बहुतेक पूर्ण झालेलें आपण पाहिलेंच आहे. या कामाचा दुसरा भाग रंगमंदिर बांधणें हा होय. हें काम आता लवकरच हातीं घेण्याचा विदर्भ साहित्य संघाचा संकल्प आहे.

आपल्याला माहीतच आहे की, नागपूर शहरांत किंबहुना साऱ्या मध्यप्रदेशांत आज अद्ययावत् साधनांनी सुसज्ज असें प्रशस्त रंगमंदिर एकहि नाही. त्यामुळे नाटकें आणि तत्सदृश इतर कलात्मक आणि सांस्कृतिक कार्यक्रम ज्या सर्वांगपूर्ण पद्धतीने व्हावयाला पाहिजेत, त्या पद्धतीने ते मध्यप्रदेशांत होऊं शकत नाहीत, असा आज सर्वांनाच अनुभव आहे. ही अत्यंत महत्त्वाची सार्वजनिक उणीव भरून काढण्यासाठी विदर्भ साहित्य संघाने रंगमंदिर बांधण्याचा आपला संकल्प चार वर्षांपूर्वीच प्रसिद्ध केलेला आहे, हें आपल्या स्मरणांत असेलच.

हें रंगमंदिर विदर्भ साहित्य संघ बांधणार असला तरी त्याचा उपयोग सर्व भारतीय भाषांच्या कलात्मक आणि सांस्कृतिक विकासाला व्हावा, अशी विदर्भ साहित्य संघाची धारणा आहे. त्यामुळे या मंदिराचा उपयोग मराठीप्रमाणेच इतरहि सर्व भारतीय भाषा बोलणाऱ्या नागरिकांना आपल्या कलात्मक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी करतां येईल. सारांश, विदर्भ साहित्य संघाचें हें रंगमंदिर सर्व भाषांच्या कलाप्रेमी जनतेचें रंगमंदिर होईल.

म्हणून मध्यप्रदेशांतील सर्व प्रांतांच्या, भाषांच्या पेशांच्या, धर्मांच्या आणि जातींच्या स्त्रीपुरुष नागरिकांनी आपल्याला शक्य होईल ती सर्व प्रकारची मदत या रंगमंदिराला स्वयंस्फूर्तीने करावी, अशी त्यांना प्रार्थना आहे. विदर्भ साहित्य संघाची आकांक्षा अशी आहे की, प्रस्तुत रंगमंदिर हें सर्व जनतेच्या साहाय्यानें बांधलें जावें; सर्व जनतेचें रंगमंदिर असें विशाल स्वरूप त्याला प्राप्त व्हावें; व जनतेच्या सांस्कृतिक विकासाचें तें मध्यवर्ती कलाकेंद्र व्हावें. त्याच्या उभारणीला केवळ पैशाच्या रूपानेच हातभार लावतां येईल असें नाही; तर त्याच्या उभारणीसाठी जें निरनिराळ्या प्रकारचें सामान लागेल, त्या सामानाच्याहि रूपाने हातभार लावतां येईल. ही गोष्ट लक्षांत घेऊन ज्यांना जें सहाय्य शक्य असेल, तें त्यांनी या रंगमंदिराच्या उभारणीला करावें.

आजच्या स्थितींत सर्व प्रकारच्या आधुनिक साधनांनी सुसज्ज असें प्रशस्त रंगमंदिर बांधावयाचें म्हणजे सुमारें तीन लाख रुपये तरी खर्च येईल. हा निधि उभारण्याच्या बाबतींत विदर्भ साहित्य संघाची सर्व भिस्त जनतेवरच आहे. म्हणून या रंगमंदिराच्या योजनेचें सर्वभाषीय आणि सर्वपक्षीय असें राष्ट्रीय आणि सांस्कृतिक स्वरूप लक्षांत घेऊन नागपुरांतील

आणि मध्यप्रदेशांतील जनतां त्याला आपुलकीनें आणि कळकळीने साहाय्य करील, असा विदर्भ साहित्य संघाला विश्वास वाटतो. विदर्भ साहित्य संघाचा हा विश्वास जनतेनें खरा करून दाखवावा आणि हें जनतेचें रंग-मंदिर उभारण्याचें श्रेय संपादन करावें, अशी विदर्भ साहित्य संघाची सर्वांना मनोभावाने प्रार्थना आहे.

बा. ग. खापर्डे अध्यक्ष,	कुसुमावती देशपांडे कोषाध्यक्ष	के. तु. मंगळमूर्ति कार्यकारी विश्वस्त
ना. रा. शेंडे उपाध्यक्ष,	अनसूया वाडेगांवकर अध्यक्ष, नागपूर नाट्यमंडळ	द. गं. करंजगावकर वास्तुविद्
ल. वि. पांढरीपांडे सरचिटणीस	इंदुमती शेवडे–च. बा. शब्दे–तु. ना. काटकर, चिटणीस	

ग. त्र्यं माडखोलकर, बाबूराव चिमोटे, नाना जोग,
संयुक्त आमंत्रक, मंदिर–रचना–निधि, समिती

विशेष सूचना

(१) तीन लक्ष रुपयांचा निधि फक्त एका वर्षांत गोळा करावयाचा आहे.
(२) हा निधि घरोघर जाऊन गोळा करावयाचा आहे.
(३) एक रुपयापासून जास्तींत जास्त देणगी कमींत कमी अवधींत प्रचारकांना देण्याची कृपा करावी.
(४) पावत्यांवर प्रचारकांची व न्या. मू. के. तु. मंगळमूर्ति ह्यांची स्वाक्षरी पाहून घ्यावी.

विदर्भ साहित्य संमेलन, १८ वें अधिवेशन

ठरावांबद्दलची सूचना

विदर्भ साहित्य संमेलनाचें १८ वें अधिवेशन तुमसर येथे भरण्याचें निश्चित झालें आहे. या संमेलनाच्या तारखा २४ आणि २५ डिसेंबर १९५९ ह्या असून संमेलनाकरिता ज्यांना ठराव पाठवावयाचे असतील ते त्यांनीं घटनेच्या नियम १८ (इ) अनुसार संमेलन भरावयाच्या तारखेपूर्वी १४ दिवस म्हणजे १० डिसेंबर १९५९ रोजीं केन्द्रीय कार्यालयांत पोचतील अशा बेताने पाठवावेत अशी विनंती आहे.

नागपूर
दि. ३०-११-५९

सरचिटणीस
विदर्भ साहित्यसंघ

ग्रंथ समालोचन

अर्थशास्त्र परिचय (भाग १ व २)

(लेखक—श्री. मुंजे, गोरे, बाळ, देशपांडे.
प्रकाशक :श्री. वा. ह. मुंजे, विद्या प्रकाशन,
रुईकर पथ, महाल, नागपूर.)

अर्थशास्त्र परिचयाची ही दुसरी आवृत्ति सुधारून वाढविलेली आहे. त्यामुळे पहिल्या आवृत्तींत आढळून येणारे कांही तुरळक दोष या आवृत्तींतून काढून टाकण्यांत आलेले आहेत. आता सबंध पुस्तक सलग, एकाच पद्धतीने लिहिलेलें वाटतें. प्रत्येक लेखकाची वेगळी छाप पडून विषय हाताळण्याच्या दृष्टीने जी एक तुटकता पहिल्या आवृत्तींत वाटत असे ती आता या नव्या आवृत्तींत दिसून येत नाही. तसेंच, कांही विषयांचें पुनर्लेखन केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या दृष्टीने ही आवृत्ति अधिक सोपी व अधिक उपयुक्त झालेली आहे. पहिल्या आवृत्तींत कांही ठिकाणीं जी क्लिष्टता आणि बोजडपणा आला होता तो या वेळीं दूर करण्यांत आलेला आहे. कांही आर्थिक सिद्धांतांचें सविस्तर स्पष्टीकरण या नव्या आवृत्तींत झाल्याने पूर्वीपेक्षा 'अर्थशास्त्र परिचया'चें स्वरूप अधिक व्यापक झालें असल्यास नवल नाही. त्यामुळे पृष्ठसंख्या देखील वाढली आहे. सिद्धान्ताचें स्पष्टीकरण करीत असतांना पाश्चात्य अर्थप्रणालींतून निघालेल्या या सिद्धान्तांना भारतीय अर्थव्यवस्थेंत कितपत स्थान आहे याचेंहि सुंदर विवेचन भूमि, श्रम, भांडवल इ० च्या चर्चेच्या वेळीं करण्यांत आलेलें असल्यामुळे या पुस्तकाची मौलिकता वाढली आहे.

भाग २ रा बी. कॉम्. च्या अभ्यासक्रमाच्या दृष्टीने मात्र अजूनहि फार त्रोटक वाटतो. भारतीय चलनपद्धतीच्या इतिहासाचीं दोन प्रकरणें तर 'शॉर्ट नोट्स' सारखीं वाटतात. तरीपण इतर कोणत्याहि मराठी पुस्तकाच्या अभावीं हें पुस्तक विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरेल यांत शंका नाही. अजूनहि जर शक्य असेल तर (१) स्टेट बँक ऑफ् इंडिया (२) दशांश चलनपद्धति (३) मुद्रा व आर्थिक नियोजन, याबद्दलचीं परिशिष्टें जोडून पुस्तक अद्यावत करतां येऊं शकेल. 'जागतिक बँक व भारत' यांच्या बाबतींत देखील अलीकडे झालेल्या करारांच्या संदर्भात एक विस्तृत टीप जोडतां येण्याजोगी आहे.

परिशिष्ट १ ते ९ मध्ये पत्रमुद्रेचा विस्तार, परदेशी व्यापार, अधिकोषांची प्रगति, अंदाजपत्रक, कर्जरोखे, किंमतींचे निर्देशांक, मजुरांचें राहणीमान, मध्यप्रदेशाचें उत्पादन, लोकसंख्या, भारताचें राष्ट्रीय उत्पन्न इत्यादींबद्दलचे उपलब्ध आकडे दिलेले आहेत. या आकड्यांचा विद्यार्थ्यांना तुलनात्मक अध्ययनाच्या दृष्टीने फार उपयोग होईल.

थोडक्यांत, बहुतेक विषयांची मांडणी विस्तृत व संघटित करून 'अर्थशास्त्र परिचय' अद्यावत करण्यांत प्रकाशकांनी मोठें औचित्य दाखविलें आहे यांत शंका नाही. बी. ए. व बी. कॉम्. च्या अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांना त्याचा खचित फायदा होईल. पुस्तकाचें बाह्यांग देखील अंतरंगाप्रमाणेच बदललें आहे. ही सुबक आवृत्ति हरिहरेश्वर मुद्रणालयाच्या कुशलतेचें एक प्रतीक समजायला हरकत नाही.

म. अ. चा

विदर्भ साहित्य संघ, परीक्षा समिति, नागपूर

महत्वाच्या सूचना

परीक्षार्थींकरिता—(१) साहित्य पारंगत व साहित्याचार्य परीक्षांकरिता आवेदन पत्रें भरण्याची मुदत १९ डिसेंबरपर्यंत वाढविली आहे.

(२) परीक्षार्थीने दिलेल्या मुदतीच्या आंतच केंद्राधिकाऱ्यांकडे आवेदनपत्र सशुल्क भरावें. स्वतंत्रपणे परीक्षासमितीकडे पाठवूं नये.

(३) नागपूरला सर्व परीक्षांचे वर्ग निःशुल्क सुरू असून पुस्तकेंहि वाचण्याकरिता मिळण्याची व्यवस्था आहे. परीक्षा समितीच्या कार्यालयांत चौकशी करावी.

(४) आवेदनपत्र, माहितीपत्र व प्रतपत्र पत्र पाठवितांच निर्मूल्य पाठविलें जाईल.

केंद्राधिकाऱ्यांकरिता—(१) सर्व केंद्राधिकाऱ्यांनी कोणत्याहि परिस्थितींत १९ डिसेंबरच्या आंत आपलीं आवेदनपत्रें एकत्रितपणे कार्यालयांत पाठविलींच पाहिजे.

(२) आवेदनपत्रें मागवितांना मोघमपणे न मागतां कोणत्या परीक्षेचीं किती हवींत हें निश्चितपणे लिहावें.

(३) विलंबाने येणारीं आवेदनपत्रें स्वीकारलीं जाणार नाहीत. तसेंच परीक्षार्थी नसलेल्या केंद्रांना ग्रंथांचें अनुदान मिळणार नाही.

(४) परीक्षाशुल्क पाठवितांना केंद्राधिकारी पुरस्कारद्रव्य नियमाप्रमाणे कापूनच चेक वा मनीऑर्डर सरचिटणीसांच्या नांवें करावी. पूर्वीच कापून न घेतल्यास मागाहून मानद्रव्य पाठविण्याची सोय नाही. परीक्षार्थी विवरण व शुल्क विवरणाचे तक्ते काळजीपूर्वक भरावेत आणि मनीऑर्डर कूपनवर केंद्राचा पत्ता व शुल्काची रक्कम याचा स्पष्ट व पूर्ण उल्लेख करावा.

(५) गतसत्रांत परीक्षाशुल्क भरून ज्यांना चालूं सत्रांत शुल्करहित बसण्याची सुविधा मिळाली आहे अशांचींहि आवेदनपत्रें इतर आवेदनपत्रांसोबत येणें आवश्यक आहे. सुविधाप्राप्त आवेदनपत्रें विलंबाने व कमी परीक्षार्थी असलेल्या केंद्रांत स्वीकारलीं जाणार नाहीत.

(प्रा.) पां. कृ. सावळापूरकर
संचालक

(प्रा.) माणिक के. बैतुले
कार्यवाह

अनुक्रमणिका

सं घ वा र्ता

ल. त्रि. पांढरीपांडे,
सरचिटणीस, वि. सा. संघ,
यांजकडून

केंद्रवृत्त, नागपूर

—: सांस्कृतिक कार्यक्रम :—

'महाभारतांतील काव्य'—

या विषयावर विदर्भ साहित्य मंदिरांत दि. ३ आणि ४ ऑक्टोबर १९५९ या दोन दिवशीं सायं. ६ वाजतां सुप्रसिद्ध संस्कृत पंडित, साहित्याचार्य, श्री. बाळशास्त्री हरदास यांचीं विद्वत्ताप्रचुर व्याख्यानें झालीं.

* *

'ग्रीक वाङ्मयांतील आचार्य अत्रे'

प्रा. अ. ना. देशपांडे यांनी दि. १९ ऑक्टोबर १९५९ रोजीं सायं. ६ वा. विदर्भ साहित्य मंदिरांत ग्रीक वाङ्मयावरील आपल्या व्याख्यानांत ग्रीकांच्या नाटय साहित्याबद्दल अभ्यासपूर्ण विवेचन केलें.

* *

— नाट्य समिति —

'उत्तररामचरितांतील सौंदर्यस्थळें'

दिं. ६-१०-५९ रोजीं सायं. ६ वाजतां विदर्भ साहित्य मंदिरांत, संस्कृतचे विद्वान प्राध्यापक श्री. स. गो. सोमलवार, यांनी नाटयसमितीच्या व्याख्यानमालेतर्फे "उत्तररामचरित्" नाटकावर अत्यंत मार्मिक व्याख्यान दिलें.

* *

कार्यकारी मंडळाची सभा

कार्यकारी मंडळाची सभा रविवार दि. ६–११–५९ रोजीं दुपारीं ४–३० वाजतां केंद्रीय कार्यालयांत संघाध्यक्ष श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली भरली.

[१] प्रथम सरचिटणिसांनी दि. १७–७–५९ च्या सभेचा अहवाल, १ जुलै ते ३१ ऑक्टोबर या चार महिन्यांचें कार्यवृत्त आणि १–४–५९ ते ३०–९–५९ या सहामाहीचा अधि-

कृत हिशेबनीसांनी तपासलेला जमाखर्चाचा तक्ता, हे वाचून दाखविले व ते सर्वानुमते मंजूर झाले.

[२] श्री. म. ग. दीक्षित यांच्या नागरीलिपी योजनेच्या ठरावानुसार म. प्र. सरकार कडून नागरी लिपीची जी प्रत आली त्या संबंधांत श्री. दीक्षित यांचेकडून सूचना मागवाव्यात असें ठरलें.

[३] मध्यप्रदेश संशोधन मंडळाचे कार्यकर्ते आणि विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष यांच्या परस्पर बैठकींत विचारविनिमय करून त्यांच्या मागणीबद्दल विचार करण्यांत यावा असें सर्वानुमतें ठरलें.

[४] श्री. रामचरण भंगी याला दि. १-११-५९ पासून आठ आणे पगारवाढ देण्यांत यावी असें ठरलें.

[५] हिंगणघाट शाखेचें कार्य पाहून त्याप्रमाणे नंतर त्यांच्या अनुदानाच्या मागणीचा विचार करण्यांत यावा असें ठरलें.

[६] नाट्य समितीला कार्यक्रमासाठी १०० रु. च्या रकमेस मंजुरी देण्यांत आली.

[७] अमरावती शाखेने मागणी केलेल्या १९५४-५९ च्या अंशदानाच्या रकमेस यावर्षी मंजूरी देतां येत नाही असें सर्वानुमतें ठरलें.

[८] अधिवेशनाबाबत निर्णय घेण्याचा अधिकार अध्यक्षांना देण्यांत आला.

* *

विदर्भ साहित्य संघाने साजरा केलेला

कै. हरिभाऊ नेने यांचा पहिला स्मृतिदिन

विदर्भ साहित्य संघाचे पूर्वाध्यक्ष, कै. हरिभाऊ नेने यांच्या पहिल्या पुण्यस्मृतिदिनानिमित्त विदर्भ साहित्य संघातर्फे मंगळवार दि. २२-११-५९ रोजीं त्यांना श्रद्धांजलि अर्पण करण्यांत आली. गेल्या वर्षी ह्याच तारखेला त्यांच्या पार्थिव देहाचें अखेरचें दर्शन विदर्भ साहित्य मंदिराने ज्यावेळीं घेतलें, त्याच वेळेवर बरोबर सकाळीं ८-३० वाजतां हा पहिला स्मृतिदिन देशभक्त मा. ज. कानेटकर यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. या प्रसंगीं, म. म. वा. वि. मिराशी, डॉ. मा. गो. देशमुख, श्री. वा. वा. भोळे, श्री. श. वा. रानडे, श्री. वासुदेवराव सुभेदार, श्री. एन्. टी. कुंटे, प्रा. पां. कृ. सावळापूरकर, श्री. ळ. वि. पांढरीपांडे, कु. ताराबाई प्रधान, श्री. रा. पु. सगदेव, श्री. र. वि. कुळकर्णी, शं. वा. फलटणकर, श्री. ना. हि. सोनडुले, श्री. ह. मा. उपाध्ये, श्री. ग. नी. भवाळकर प्रभृति कार्यकर्ते व सभासद उपस्थित होते.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे उपाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणांत कै. हरिभाऊंच्या मृत्यूनंतर त्यांच्या स्मारकाच्या संकल्पाची सांगता कांही अडचणीमुळे आज होऊं शकली नाही तरी स्मारकाच्या योजनेचें कार्य सुरू असून तें शक्य तों लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल असा विश्वास प्रकट केला.

त्यानंतर श्री. मा. ज. कानेटकर यांच्या हस्तें कै. हरिभाऊंच्या छायाचित्राला पुष्पमाला अर्पण करण्यांत आली. गडकरी स्मारक समितीतर्फेहि पुष्पमाळा अर्पण करण्यांत आली.

डॉ. मा. गो. देशमुख यांनी सध्या कार्यान्वित असलेल्या कै. नेने स्मारक योजनेसाठी अनेक आश्वासनें आणि कांही रोख देणग्याहि मिळाल्या आहेत व नागपुरांतील कै. हरिभाऊंच्या चाहत्यांनी एक समितीहि स्थापन केली आहे असें सांगितलें. स्मारकाची आपली कल्पना सांगतांना ते म्हणाले कीं, कै. हरिभाऊंचें जें संशोधनात्मक साहित्य मराठी मासिकांतून वेगवेगळें वेळोंवेळीं प्रसिद्ध झालें आहे, तें सर्व एकत्र करून त्यांचा एक मौलिक संग्रह प्रकाशित करण्यांत यावा. संशोधनाच्या प्रांतांतील त्यांच्या ज्ञानाचा सर्वांना लाभ होण्याचा मार्ग उपलब्ध करून देणें हेंच एक त्यांचें औचित्यपूर्ण स्मारक होईल.

प्राचार्य वा. वि. मिराशी यांनी कै. हरिभाऊंच्या विदर्भ साहित्य संघांतील कार्याचा उल्लेख करून डॉ. देशमुख यांनी सुचविलेल्या योजनेला दुजोरा दिला. केवळ आश्वासनें आणि देणग्या यावर विसंबून न राहतां विदर्भ साहित्य संघाच्या प्रकाशन समितीने या कामीं पुढाकार घेऊन हरिभाऊंचें ऋण फेडावें अशी सूचना केली.

प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांनी या ऋषि–ऋण फेडण्याच्या कामीं मध्यप्रदेश संशोधन मंडळहि अत्यंत तत्परतेने सहकार्य द्यावयास तयार आहे, असें आश्वासन दिलें.

शेवटीं श्री. मा. ज. कानेटकर यांनी अत्यंत मार्मिक शब्दांत उद्‌बोधक भाषण दिलें. त्यांनी समानता व एकता यांचें महत्त्व सोदाहरण पटवून देऊन सरस्वतीच्या मंदिराची महत्ता विशद केल्यानंतर एक मिनिट स्तब्ध उभें राहून सभेने, कै. हरिभाऊंना आदरांजलि अर्पण केली.

* *

शाखावृत्त : खामगांव शाखा

विदर्भ साहित्य संघाच्या खामगांव शाखेने मद्यपान निषेध सप्ताहानिमित्त प्रा. पद्माकर डावरे लिखित 'सीमोल्लंघन' नाटकाचा यशस्वी प्रयोग करून दाखविला.

खामगांव शाखेतर्फे कोल्हटकर स्मारक निधि उभारण्यासाठी दोन नाट्यप्रयोगांचें आयोजन करण्यांत आलें आहे.

* *

अनुक्रमणिका

तुमसर वृत्त

विदर्भ साहित्य संघाचें संमेलन

तुमसर येथे दि. २४ व २५ डिसेंबर १९५५ ला १८ वें अधिवेशन भरणार

विदर्भ साहित्य संघाचें १८ वें अधिवेशन शनिवार व रविवार दि. २४ व २५ डिसेंबर १९५५ रोजीं, संघाध्यक्ष श्रीमान बाबासाहेब खापर्डे यांचे अध्यक्षतेखाली तुमसर (जि. भंडारा) येथे भरविण्याचें निश्चित ठरलें आहे. स्वागत मंडळाची स्थापना झाली असून श्री. मनहरभाई पटेल, विधानसभासदस्य हे या संमेलनाचे स्वागताध्यक्ष व म. प्र. चे भूतपूर्व मंत्री श्री. आ. म. माकडेगुरुजी हे कार्याध्यक्ष आहेत. संमेलनासाठी उपसमित्याहि स्थापन झाल्या असून अधिवेशनाची जय्यत पूर्वतयारी सुरू झाली आहे.

* *

तुमसर शाखेचें श्री. ना. रा. शेंडे यांचे हस्तें उद्घाटन

रविवार दि. २७-११-५५ रोजीं तुमसर येथील श्रीराम थिएटरमध्ये देशभक्त श्री. आ. म. माकडेगुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या सभेंत विदर्भ साहित्य संघाच्या तुमसर शाखेचें, वि. सा. संघाचे उपाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचे हस्तें उद्घाटन झालें. त्यावेळीं सरचिटणीस श्री. ल. वि. पांढरीपांडे यांचेंहि प्रसंगोचित भाषण झालें.

* *

विदर्भ साहित्य संघ, तुमसर शाखा, कार्यकारी मंडळ

अध्यक्ष : श्री. आ. म. माकडे गुरुजी.

कार्याध्यक्ष व कोषाध्यक्ष : श्री. मो. प. दामले गुरुजी.

उपाध्यक्ष : १. श्री. नारायणरावजी कारेमोरे, २. श्री. वासुदेवराव कोंडेवार.

सरचिटणीस : श्री. रा. र. सरदेशपांडे.

चिटणीस : १. श्री. के. एम्. तेलरांधे, २. श्री. शं. वि. काणे, ३. श्री. व्ही. आर. टिल्लू.

सभासद : श्री. भिमरावजी मलेवार, श्री. श्री. वा. खडक्कर, श्री. र. शा. जोशी, श्री. महादेवराव खोवरागडे, श्री. नानासाहेब पेंढारकर, श्री. मा. वा. निखाडे, श्री. चिं. ना. गद्रे, श्री. कारुजी घोडीचोर गुरुजी, श्री. भैयासाहेब देशपांडे, श्री. र. ल. घडले गुरुजी, श्री. पीरमहंमद, श्रीमती दुर्गाबाई सोमण.

विदर्भ साहित्य संघ

विभाग (अ) मताधिकारी सभासद

१९५६–५७ सालाकरिता
कार्यकारी मंडळाची निवडणूक
सभासदांची यादी १९५५

सभासदांना विशेष सूचना

१. दिनांक १५ आक्टोवर १९५५ पर्यंत जे सभासद नोंदलेले आहेत व ज्यांच्याकडे कोणतीहि वर्गणी थकित नाही अशाच सभासदांचा दुरुस्तीच्या घटना नियम नं. १२ (आ) प्रमाणे प्रस्तुत मतदार सभासदांच्या 'अ' आणि 'ब' विभागाच्या सूचींत समावेश करण्यात आला आहे.

२. निवडणुकीस उमेदवार म्हणून उभे राहण्याचा अधिकार सभासद होऊन ज्यांना वि. सा. संघाच्या नियमाप्रमाणे एक वर्ष झालें आहे अशाच सभासदांस आहे. त्यांचीं नांवें घटना नियम नं. १२ (इ) प्रमाणे प्रस्तुत सूचींतील 'अ' मध्ये दर्शविलीं आहेत.

३. या सूचींतील नांवांबद्दल जर कोणा सभासदाची तक्रार असेल तर नियम नं. १२ (अ) प्रमाणें त्याने दिनांक १५ डिसेंबर १९५५ पर्यंत अध्यक्षांकडे श्री केन्द्रीय कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावी.

अनवधानतेने कांही नांवांत कमी अधिक फरक पडला असल्यास त्या सभासदांनी तशी सूचना त्वरित देण्याची कृपा करावी, अशी नम्र विनंती आहे.

दि. २०–११–१९५५
केन्द्रीय कार्यालय
उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १.

ल. वि. पांढरीपांडे
सरचिटणीस, वि. सा. संघ

उपकर्ते

	र. क्र.
१ श्रीमंत लक्ष्मण श्रीधर उर्फ बाबुराव देशमुख, महाल, नागपूर–२	१
२ श्रीमंत सौ. सत्यभामाबाई लक्ष्मणराव देशमुख, महाल, नागपूर–२.	२

आश्रयदाते

	र. क्र.
१ श्रीमंत गोविंदराव वि. काणे, सेवानिवृत्त तहसिलदार, मोदीलाईन नं. ३, सीताबर्डी, नागपूर–१	९०
२ श्रीमंत एम्. जी. चिटणवीस, चिटणविसपुरा, नागपूर–२.	१०२

र. क्र.

३ श्रीमंत शंकरराव जोग, १००
प्रोप्रायटर, फुगा फॅक्टरी, अजनी, नागपूर.

४ श्रीमंत त्र्यं. द. देशमुख, पारवेकर, १९
'मंगलालय', हंपयार्ड रोड, नागपूर–१

५ श्रीमंत भास्करराव बुटी, १०१
सीताबर्डी, नागपूर–१

६ श्री. मॅनेजर, ५९
दी नागपूर इलेक्ट्रिक लाईट अॅन्ड पॉवर कं., लि.,
सदर, नागपूर–१

७ श्री. माघव पेंडसे, ५८
सरचिटणीस, सहकारी संस्था,
घंतोली, नागपूर–१

सहाय्यक सभासद

१ लोकनायक माधव श्रीहरी अणे, ३
तूलकरांचा वाडा, ३४२, सदाशिव पेठ,
पुणें–२

२ श्री. विठ्ठलराव जोग, १०३
फुगा फॅक्टरी, अजनी, नागपूर.

हितचिंतक सभासद

१ न्या. मू. के. तु. मंगळमूर्ति, ४
हायकोर्ट जज्ज, घरमपेठ, नागपूर–१

आजीव सभासद

नागपूर

१ श्री. विनायक नारायण अळेकर, ९१
नवी शुक्रवारी, नागपूर–२

२ श्री. आ. नी. उधोजी, १०७
रहाटे कॉलनी जवळ, जेलरोड, नागपूर–१

३ सौ. पद्मावतीबाई कळमकर, ५६
धरमपेठ, नागपूर–१

४ सौ. अनसूयाबाई काळे, ४१
धंतोली, नागपूर–१

र. क्र.

५ श्री. आनंदराव पुरुषोत्तम काळे, ५१
धंतोली, नागपूर–१

६ श्री. काशिनाथ पुरुषोत्तम काळे, ५३
धंतोली, नागपूर–१

७ श्री. पुरुषोत्तम बाळकृष्ण काळे, ५०
धंतोली, नागपूर–१

८ श्री. बाळकृष्ण पुरुषोत्तम काळे, ५२
धंतोली, नागपूर–१

९ प्रा. श्रीकृष्ण गोपाळ काशीकर, ४६
राज्यशास्त्र विभाग, नागपूर विद्यापीठ,
नागपूर–१

१० प्रा. डॉ. वि. भि. कोलते, १२
७१, वेस्ट सेंट्रल रोड, धंतोली, नागपूर–१

११ श्री. दत्तात्रय नारायण कोल्हटकर, ९०
१०, संगमचाळ, सीताबर्डी, नागपूर–१

१२ डॉ. गदाधर त्र्यंबक खरे, ७७
रामदासपेठ, नागपूर–१

१३ सौ. प्रभावतीबाई खरे, ९७
रामदास पेठ, नागपूर १

१४ श्री. वि. ल. खरे, बी. कॉम., ३५
वसंत भुवन, धंतोली, नागपूर १

१५ श्री. महेश्वर जनार्दन गद्रे, ऑडिटर, ११६
रामदासपेठ, नागपूर १

१६ श्री. श्रीकृष्ण विठ्ठल गंत्रे, ५५
संपादक, "शारीरिक शिक्षण,"
लोथे बंगला, धंतोली. नागपूर १

१७ सौ. प्रभावतीबाई जकातदार, ११०
सिव्हिल लाइन्स, नागपूर १

१८ डॉ. के. जी. जोशी, ७२
सोनी लेन, सीताबर्डी, नागपूर १

१९ श्री. पुरुषोत्तम रामचंद्र जोशी, ६५
२४५, सोनी लेन, सीताबर्डी, नागपूर १

	र. क.
२० श्री. के. के. ठाकूर, धंतोली, नागपूर १	८२
२१ श्री. रा. शं. डबीर, वकील, रामदासपेठ, नागपूर १	८१
२२ श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे, संपादक, 'महाराष्ट्र', महाल, नागपूर २	२०
२३ श्री. के. व्ही. तांबे, अॅड्व्होकेट, रामदासपेठ, नागपूर १	८४
२४ डॉ. वि. ना. थत्ते, धरमपेठ एक्स्टेंशन, नागपूर १	७६
२५ श्री. प्रभाकर जगन्नाथ दिवाडकर, "गोविंद सदन," छोटी धंतोली, नागपूर १	६६
२६ श्रीमती द्वारकाबाई देऊस्कर, धंतोली, नागपूर १	८७
२७ श्री. व्ही. एन. देव, रिटा. डिस्ट्रिक्ट जज्ज, "मातृछाया", धंतोली, नागपूर १	८३
२८ प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, धंतोली, नागपूर १	३०
२९ श्री. पुरुषोत्तम यशवंत देशपांडे, रामदास पेठ, नागपूर १	७
३० सौ. विमलाबाई देशपांडे, रामदासपेठ, नागपूर १	१८
३१ श्री. मधुकर लक्ष्मणराव देशमुख, C/o श्रीमंत बाबूराव देशमुख महाल, नागपूर २	६२
३२ कु. मंदाकिनी लक्ष्मणराव देशमुख, C/o श्रीमंत बाबूराव देशमुख, महाल, नागपूर २	६३
३३ प्रा. डॉ. मा. गो. देशमुख. सरनाईकांचा बंगला, धंतोली, नागपूर १	१४
३४ श्रीमती सगुणाबाई देशमुख, धंतोली, नागपूर १	४४
३५ श्रीमंत मारोतराव दत्ताजी धनवटे, शिवराज फाईन आर्ट लिथो वर्क्स, नागपूर २	७३
३६ श्रीमंत सौ. सुमतीबाई मारोतराव धनवटे, शिवराज फाईन आर्ट लिथो वर्क्स, नागपूर २	७४
३७ श्री. श्री. वा. धावे, अॅडव्होकेट, अयाचितबुवा मंदिराजवळ, नागपूर-२	९५
३८ श्री. देवराव अंबादास नाईक, नाईक मॅन्शन, टिळकरोड, नागपूर-२	६१
३९ श्री. ए. श्री. पटवर्धन, सुभेदार ब्लॉक, नं. ५, कॉंग्रेस नगर, नागपूर-१	२१
४० ले. क. भा. त्रि. परांजपे, "त्र्यंबकेश्वर", नं. ४६७, मॉरिस कॉलेज मैदानासमोर, छोटी धंतोली, नागपूर-१	५४
४१ श्री. द. ल. पराडकर, ज्वाला इंडस्ट्रिज, शांतिनगर, इतवारी नागपूर-२	२२
४२ श्री. के. बी. पळसुले, रिटा. डिस्ट्रिक्ट जज्ज, धंतोली, नागपूर-१	८६
४३ श्री. गोपाळराव पाठक, C/o पाठक ब्रदर्स, टिळकरोड, महाल नागपूर-२	९२
४४ डॉ. धोंडो महादेव पालकर, धरमपेठ, नागपूर-१	६४
४५ डॉ. शं. दा. पेंडसे, कॉंग्रेसनगर, नागपूर-१	६७
४६ श्री. फुलकुमार पोद्दार, धरमपेठ, नागपूर-१	३८
४७ श्री. बी. एल. वांगडे, प्रो. भारत रेडिओ हाऊस, महाल, नागपूर-२	४०
४८ श्री. ब्रिजलाल नंदलाल बियाणी, अर्थमंत्री, म. प्र., नागपूर-१	२५

र. क्र.

४९ श्रीमंत ताराबाई बुटी, ३६
संगमेश्वर, सीताबर्डी, नागपूर–१

५० श्रीमंत विश्वनाथ पूर्णचंद्रराव बुटी, ७०
जेलरोड, नागपूर–१

५१ प्रा. नारायण केशव वेहेरे, ११
हंपयार्ड रस्ता, कॉंग्रेसनगर, नागपूर–१

५२ प्रा. माणिक के. वंजुले, १३१
एम्. ए., (हिंदी–मराठी) सा. रत्न,
मंडल क्र. ७, महाल, नागपूर–२

५३ श्री. छगनलालजी भरूका, ११२
धंतोली, नागपूर–१

५४ सौ. सरलाबाई भावे, ९३
c/o डॉ. का. द. भावे, धंतोली, नागपूर–१

५५ श्री. गो. आ. भोंसुळे, ३३
भोंसुळे–श्रौति कं., धनवटे चेंबर्स,
सीताबर्डी, नागपूर–१

५६ श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, १३
'प्रसाद', अभ्यंकर रोड, धंतोली, नागपूर–१

५७ श्री. चंद्रशेखर गजानन माडखोलकर, ९६
"प्रसाद", अभ्यंकर रोड, धंतोली नागपूर–१

५८ सौ. शांताबाई माणकेश्वर, ७१
धंतोली, नागपूर–१

५९ म. म. प्रि. वा. वि. मिराशी, १०८
"विष्णुसदन", धरमपेठ एक्स्टेन्शन नागपूर–१,

६० श्री. एकनाथ जनार्दन मोहरीर, ॲडव्होकेट, १०९
धंतोली, नागपूर–१

६१ श्री. सदाशिव विश्वनाथराव लिमये, १११
मोदी लाईन नं. ३, लिमयेवाडा,
सीतावर्डी, नागपूर–१

६२ वें. शेषराव वानखेडे, ४७
सिव्हिल लाइन्स, नागपूर–१

६३ डॉ. वासुदेव गणेश शिंगणापूरकर, ७८
वाकररोड, महाल, नागपूर–२

र. क्र.

६४ श्री. गोविंदराव श्रौति, ८९
'हिंदफिन', धनवटे चेंबर्स, सीताबर्डी, नागपूर–१

६५ सौ. विजया श्रौति, ३४
दक्षिणामूर्ति रोड, स. नं. ७, महाल, नागपूर–२

६६ श्री. रा. पु. सगदेव, १७
" प्रभा निवास, " जेलरोड, नागपूर–१

६७ सौ. प्रभावतीबाई राजारामपंत सगदेव, ६९
" प्रभा निवास, " जेलरोड नागपूर–१

६८ श्री. भैय्यासाहेब सप्तर्षी, ९८
धरमपेठ, नागपूर–१

६९ सौ. कमलाबाई सरवटे, ८५
३७८, रामदासपेठ, नागपूर–१

७० श्री. रामचंद्र मार्तंड हजरनवीस, ॲडव्होकेट, ७९
धरमपेठ, नागपूर–१

(जिल्हा अमरावती)

१ कविभूषण अण्णासासाहेब खापर्डे, १०
खापर्डेवाडा, अमरावती

२ श्रीमान् बाबासाहेब खापर्डे, ९
खापर्डेवाडा, अमरावती

३ श्री. गो. वा. चिपळूणकर, ९४
डिस्ट्रिक्ट जज्ज, अमरावती

४ श्री. द. ना. ठाकूर, ५
मॅनेजिंग एजंट, ठाकूर आणि कं. लि.,
बडनेरा रोड, अमरावती

५ श्री. श्री. स. पेंढरकर, ८
मुधोळकरपेठ, अमरावती

६ प्रा. भ. श्री. पंडित, २८
दामले यांचा बंगला, स्टेशनजवळ, अमरावती

७ कु. शांता राजे, ११९
शाळा निरीक्षिका, विदर्भ मंडळ, अमरावती

८ श्री. अरुणकुमार देशमुख, जनुनेकर, १६
जनुना, (जि. अमरावती)

	र. क्र.
(जिल्हा अकोला)	
१ सौ. सरस्वतीबाई महाजनी, ताजनापेठ, अकोला	२४
२ श्री. अ. भा. माटे, गंगाधर प्लॉटस्, अकोला	२७
(जिल्हा चांदा)	
१ शेठ खुशालचंदजी खजांची, चांदा	२६
२ श्री. र. सी. देवईकर, अॅड्व्होकेट, चांदा	११७
३ श्री. बलवंत राघव उर्फ बाबासाहेब देशमुख, बालाजी वार्ड, चांदा	१२२
४ श्री. रामचंद्र राजेश्वरराव उर्फ बाबुरावजी पोटदुखे, बालाजी वार्ड, चांदा	१२२
(जिल्हा छिंदवाडा)	
१ श्रीमती लक्ष्मीबाई धर्माधिकारी, पांढुर्णा, जि. छिंदवाडा	४९
(जिल्हा जबलपूर)	
१ श्री. र. गो. ओक, ओक आश्रम, गोलबाजार, जबलपूर	३७
(जिल्हा बिलासपूर)	
१ श्री. काशीनाथ बाळकृष्ण सहस्रबुद्धे, सब ब्लॉक इन्स्पेक्टर, बिलासपूर (R. S.)	१२१
(जिल्हा बुलढाणा)	
१ श्री. ज. भि. कोलते, अरुण मुद्रणालय, मलकापूर, जि. बुलढाणा	३२
(जिल्हा भंडारा)	
१ श्री. पु. वि. आपटे, खातीपुरा, भंडारा	११८
२ श्री. विठ्ठलराव रा. गुर्जर खातीपुरा, भंडारा	१०५
३ श्री. ना. तु. गोसावी, वकील, भंडारा	११४
४ श्री. ना. रा. जोशी देववर वार्ड, भंडारा	१०६
५ श्री. वि. कृ. मोघे, अे. बेफ्, ओ. भंडारा	११३
६ श्री. नारायणराव राजारामपंत हार्डीकर, बस्तरवारी, भंडारा	१०४
७ श्री. ना. ग. डव्रीर, वकील सिव्हिल लाईन्स, गोंदिया, जि. भंडारा	३१
८ श्री. वी. अ. लिमये, अॅड्व्होकेट गोंदिया, जि. भंडारा	१५
९ श्रीमती सरस्वतीबाई बाईकर, सिव्हिल लाइन्स, गोंदिया, जि. भंडारा	३९
१० श्री. ग. गो. व्यवहारे, रेलटोली, गोंदिया, जि. भंडारा	४२
११ सेठ छोटूसाभाई लहानुसाभाई क्षत्रिय, कटंगी लाईन, गोंदिया, जि. भंडारा	११५
(जिल्हा यवतमाळ)	
१ श्री. कृष्ण विनायक देशपांडे, मु. दिग्रस, जि. यवतमाळ	६
(जिल्हा वर्धा)	
१ श्री. विनायक गोविंद देशपांडे, इन्कमटॅक्स ऑफिसर, वर्धा	६८
२ श्री. रामेश्वर बजाज, आर्जीरोड, वर्धा	२३
३ श्रीमती गंगूताई भिसे, हेडमिस्ट्रेस, गर्ल्स हायस्कूल, आर्वी, जि. वर्धा	९९

परप्रांतीय — र. क्र.

१ डॉ. शंकर गोविंद जोशी, आय. डी. हॉस्पिटल, अहमदाबाद — ८८

२ श्री. आ. रा. देशपांडे, कॉन्स्टिट्यूशन हाऊस, नवी दिल्ली — २९

३ श्री. चिं. द्वा. देशमुख, अर्थमंत्री, गव्हर्मेंट ऑफ इंडिया, दिल्ली — ४३

४ श्री. पी. डी. देशमुख, ७, क्लाइव्ह रोड, नवी दिल्ली — ८०

५ श्री. कुमार गंधर्व, "साई निवास", मोतीबाग, देवास (म. भा.) — १२३

६ श्री. प्र. श्री. कोल्हटकर, पोष्ट बॉक्स ५४५, पुणें २ — ४८

७ श्री. वसंत बाळकृष्ण देशपांडे, ३९६ म, सदाशिव पेठ, पुणें २ — ७५

८ श्री. रामकृष्ण किसनजी धोटें, मुंबई फाईन आर्ट लिथो वर्क्स, १०, ससेक्स रोड, व्हिक्टोरिया गार्डन, मुंबई २७ — ४५

९ सौ. ताराबाई यशवंतराव कुळकर्णी, c/o श्री. वाय्. पी. कुळकर्णी, डी. व्ही. एस्. सोलापूर. — ५७

साधारण सभासद (वा. व. ३ रु. देणारे)

नागपूर जिल्हा

नागपूर — र. क्र.

१ श्री. मदनगोपाल जोधराज अग्रवाल, सीतावर्डी, नागपूर–१ — १७५

२ श्री. गोवर्धन जोधराज अग्रवाल, सीताबर्डी, नागपूर–१ — १७४

३ श्री. राम आगरकर, c/o रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, नागपूर–१ — ७७

४ श्री के. मा. आराध्ये, एम्. ए., काव्यतीर्थ, फाटे यांचा वाडा, चिटणीसपुरा, नागपूर–२ — १५

५ श्री. चिंतामणी रामचंद्र आठवले, गोरक्षण जवळ, धंतोली, नागपूर–१. — १५४

६ श्री. महंमद इक्‌बालखान c/o श्री. उषोजी बॅचलर्स होम, जेलरोड, नागपूर–१ — १६१

७ श्री. भास्कर नारायण उपाध्ये स. नं. १८। २४ बजरिया, नागपूर २ — ७१

८ सौ. इंदिराबाई सदाशिव ओक, महाजन चाळ, सीतावर्डी, नागपूर–१ — १२५

९ श्री. अनंत दामोद ओक, साठे यांचा बंगला, पार्करोड धंतोली, नागपूर १ — २३

१० ,, दिगंबर प्रभाकर ओगले c/o नागपूर ग्लास वर्क्स, नागपूर–२ — १८२

११ ,, नारायण गोपाळ ओगले "महाराष्ट्र" कार्यालय, नागपूर–२ — १७९

१२ सौ. नलिनी नारायण ओगले, c/o "महाराष्ट्र" कार्यालय, नागपूर–२ — १८०

१३ श्री. म. न. अंजीकर, खांडेकरांचा बंगला, धंतोली, नागपूर–१ — १२२

१४ श्री. पुरुषोत्तम कृष्ण करंदीकर, छोटी धंतोली, नागपूर–१ — १०१

र. क्र.

१५ श्री. नी. सी. कारखानीस, १३८
संगमचाळ, सीताबर्डी, नागपूर–१

१६ श्री. नरसिंह बळवंतराव १८७
उर्फ बाळासाहेब काळे, नगरनाईक,
इतवारी, नागपूर–२

१७ डॉ. एस्. व्ही. काळे, १९२
वेस्ट हायकोर्ट रोड, धरमपेठ एक्स्टेंशन,
नागपूर–१

१८ श्री. मनोहर कायंदे, ११३
मामारोड, धरमपेठ, नागपूर–१

१९ श्री. नारायण मोरेश्वर काटदरे, ११५
आर्यन प्रेस, जेलरोड, सीतावर्डी, नागपूर-१

२० श्री. केशव बळवंत कावरे, १७
20/c4, मिनिस्टेरिअल क्वार्टर्स,
तेलंखेडी, नागपूर–१

२१ प्रा. गो. मा. कुळकर्णी, एम्. ए. एलएल बी, ५५
स. नं. ६ अ, महाल, नागपूर–२

२२ श्री. ना. हं. कुळकर्णी, कलाकार, ९
गोरेपेठ, नागपूर–१

२३ श्री. र. वि. कुळकर्णी, ३
रामदासपेठ, नागपूर–१

२४ श्री. शं. ब. कुळकर्णी, मुख्य कलाकार, ६
सुभाषचंद्र रोड, नागपूर–२

२५ श्री. शंकर वामन कुळकर्णी, ३८
काँग्रेसनगर, नागपूर–१

२६ प्रा. श्री. मा. कुळकर्णी. एम्. ए. ५६
स. नं. ६ अ, महाल, नागपूर–२

२७ श्री. स. ना. कुळकर्णी, १२४
धरमपेठ, नागपूर–१

२८ श्री. एन्. टी. कुंटे, बी. ए. एलएल बी., ६०
गीरीपेठ, नागपूर–१

र. क्र.

२९ श्रीमती इंदुताई केळकर, ४७
लेडी डागा कॉलेज फॉर वुईमेन,
सेमिनेरी हिल्स, नागपूर–१

३० सौ. मंदाकिनीबाई केळकर, ६६
c/o श्री. एम्. व्ही. केळकर,
बी. ए. एलएल बी.,
वेस्ट पार्करोड, धंतोली, नागपूर–१

३१ श्री. केशवराव केळकर, १३५
रामदासपेठ, नागपूर–१

३२ श्री. र. ग. केळकर, १३६
रामदासपेठ, नागपूर–१

३३ श्री. अशोक व्यंकटेश कोठेकर, ४०
c/o इंदिराबाई कोठेकर,
२१५, कॅनॉलरोड, रामदासपेठ, नागपूर–१

३४ सौ. उषाताई कोलते, १३९
धंतोली, नागपूर–१

३५ श्री. प्र. दे. कोलते, बी. ए. बी. टी. ५३
यमुना निवास, दक्षिणामूर्ति पथ,
महाल, नागपूर–२

३६ श्री. सदाशिव लक्ष्मण खाडिलकर, १४२
प्रो. नारके यांचा बंगला, जेलरोड, नागपूर–१

३७ श्री. वामन केशव खेडकर, ४८
गाडगीळांची चाळ, पटवर्धन हायस्कूल जवळ
सीताबर्डी, नागपूर–१

३८ श्री. आनंद गणेश खोत, ६९
मोदी नं. ३, सीताबर्डी, नागपूर–१

३९ श्री. मनोहर रामचंद्र खोलकुटे, १५०
महाल, नागपूर–२

४० श्री. रामचंद्र सीताराम खोलकुटे, ॲड्व्होकेट, १४५
राजविलास टॉकीजजवळ, महाल, नागपूर–२

४१ श्री. ह. आ. खोवरागडे, १३४
सरकारी घोखामेळा वसतीगृह, नागपूर

र. क्र.

४२ श्री. पुरुषोत्तम विश्वनाथ खांडेकर, १२६
" श्रीधाम ", जेलरोड, नागपूर–१

४३ श्री. रामकृष्ण मारोतराव गजभिये, २९
भंडार मोहल्ला, वेझनबाग, नागपूर-४

४४ श्री. पां. बा. गडकरी, ॲडव्होकेट, ३३
वाकररोड, नागपूर–२

४५ श्री. प्रभाकर शंकर गडकरी, १५७
साठे यांचें घर, रोड नं. 'सी',
धंतोली, नागपूर–१

४६ श्री. मा. नी. गलगलीकर, ११६
राममंदिर गल्ली, महाल, नागपूर–२

४७ श्री. परशुराम बाळकृष्ण गानू, २४
धरमपेठ, नागपूर–१

४८ श्रीमती लक्ष्मीबाई गाडगीळ, १४१
लोथे यांचा बंगला, धंतोली, नागपूर–१

४९ श्री. बी. जे. गावंडे, १७०
स. नं. १, गंजीपेठ, नागपूर–२

५० श्री. तु. वि गेडाम, ३०
महारपुरा, सीताबर्डी, नागपूर–१

५१ सौ. लक्ष्मीबाई गोखले, ४९
पोलीस स्टेशन जवळ, सीताबर्डी, नागपूर–१

५२ श्री. वासुदेव गोपाळ गोखले, ४६
बिल्डिंग इंजिनिअर, धंतोली, नागपूर–१

५३ श्री. द. रा. गोमकाळे, सिव्हिल जज्ज, ७९
"राजाराम भुवन", राजाच्या कोठीमागे,
महाल, नागपूर–२

५४ श्री. द. कृ. गोडवोले, ६३
बी. कॉम, एफ्. बी. टी. आय.
श्री. वाडेगावकरांचा बंगला,
धंतोली, नागपूर–१

५५ सौ. इंदुमति गंधे, १६८
लोथे यांचा बंगला, धंतोली, नागपूर–१

र. क्र.

५६ श्री. गोविंद भगवंत गंधे, ८७
बी. ए. एलएल. बी., ॲड्व्होकेट,
हनुमानरोड, सीताबर्डी, नागपूर–१

५७ श्री. न. दि. घारपुरे, एम्. ए., ९१
टेंपल बाजार रोड, सीताबर्डी, नागपूर–१

५८ श्री. हनुमंत गंगाधर घारपुरे, १७१
ग्रीन व्हिला, धंतोली, नागपूर–१

५९ श्री. रा. ना. घाटोळे, एम्. ए. बी. टी., ५१
c/o श्री बाबुराव वेदक, स. नं. ९
मोठ्या अयाचित मंदिराजवळ, नागपूर–२

६० श्री. श्रीधर गोविंद चरडे १९१
c/o डॉ. एस्. व्ही. काळे यांचा बंगला,
वेस्ट हायकोर्ट रोड, धरमपेठ एक्स्टेंशन,
नागपूर–१

६१ श्री. त्रिंबक हरि चाफेकर, १०४
राममंदिर गल्ली, महाल, नागपूर २

६२ प्रा. मधुसूदन अनंत चान्सरकर, ४२
मामारोड, धरमपेठ, नागपूर १

६३ सौ. लक्ष्मीबाई मा. चिटणवीस, १७६
चिटणवीसपुरा, नागपूर २

६४ श्री. चिटणीस, ९९
राजाराम दीक्षित वाचनालय
सीताबर्डी, नागपूर १

६५ श्री. दाजीशास्त्री चांदेकर, १८४
दक्षिणामूर्ति चौक, नागपूर २

६६ सौ. इंदुताई दि. चितळे, १८८
चितळे बंगला, धंतोली, नागपूर १

६७ सौ. नीलिमा चिमोटे, १०३
संगमचाळ, सीताबर्डी, नागपूर १

६८ श्री. बाबुराव चिमोटे, १०६
संगमचाळ, सीताबर्डी, नागपूर–१

६९ श्री. त्रिंबक अण्णाजी चोरघडे, १०५
नागोबाची गल्ली, स. नं. ७, नागपूर–२

र. क्र.

७० श्री. प्रभाकर रावजी जयवंत, ४
३४५, वेस्ट पार्करोड, धंतोली, नागपूर–१

७१ श्री. भी. रं. जवाजी, बी. ए, एलएल., बी., ११८
c/o "पराग" कार्यालय,
सीताबर्डी, नागपूर–१

७२ श्री. मा. गो. जामदार, एम. ए. ५४
मोतीबाग्रा जामदारवाडा, स. नं. ६, अ,
महाल, नागपूर–२

७३ सौ. ललिता माधव जामदार, ५९
सा. पारंगत, रा. भा. रत्न,
मोतीबाबा जामदार वाडा, स. नं. ६,
महाल, नागपूर २

७४ श्री. वामन बळवंत जामदार, ५८
मोतीबाबा जामदार वाडा, स. नं ६,
महाल, नागपूर २

७५ श्री. मनोहर जुनघरे, १३
आंबेडकर टाऊन, धरमपेठ, नागपूर–१

७६ श्री. आनंद गणेश जोग, ९५
गोखले व्हिला, काँग्रेसनगर, नागपूर–१

७७ श्री. नानासाहेब जोग, ९४
गोखले व्हिला, काँग्रेसनगर, नागपूर–१

७८ श्री. दत्तात्रय रंगनाथ जोशी, बी. ए. ८६
उपासनी यांचा वाडा, टेकडी लाईन,
सीतावर्डी, नागपूर–१

७९ श्री. भास्कर आत्माराम जोशी, ९७
"वासुदेव सदन" सीतावर्डी, नागपूर–१

८० श्री. मनोहर जोशी, १०
वुटींच्या वाड्याजवळ, सीतावर्डी, नागपूर–१

८१ श्री. र. गो. जोशी, ६४
मुख्याध्यापक, युगान्तर हायस्कूल,
सदर, नागपूर–१

८२ श्री. सखाराम वामन जोशी, १०७
१३४, राममंदिर गल्ली, महाल, नागपूर–२

र. क्र.

८३ श्री. ल. ग. डवीर, ९३
मामारोड, धरमपेठ, नागपूर–१

८४ श्री. एस्. व्ही. डोळे, ६९
अध्यापक, युगान्तर हायस्कूल, सदर, नागपूर–१

८५ सौ. शालिनी पुरुषोत्तम ढवळे, १८१
c/o "महाराष्ट्र" कार्यालय, नागपूर–२

८६ श्री. दत्तात्रय काशीनाथ तारे, १३१
c/o वाय. वी. आपटे,
"दत्तनिवास", धरमपेठ, नागपूर–१

८७ श्री. ना. ख. तिरपुडे, १६९
उपअर्थमंत्री, मध्यप्रदेश,
सिव्हिल लाइन्स, नागपूर–१

८८ श्री. लक्ष्मीकांत वासुदेव तेलंग, १४६
लक्ष्मी बँकेचे मागे, सीतावर्डी, नागपूर–१

८९ श्री. म. गं. दातार, जनसंपर्क अधिकारी, १४९
धंतोली, नागपूर–१

९० श्री. द. प. दाते, १०९
२६८, सेंट्रल बझाररोड,
नवी रामदासपेठ, नागपूर–१

९१ श्री. मनोहर गणेश दीक्षित, २२
"गणेश विश्राम", रामदासपेठ, नागपूर–१

९२ प्रा. अ. ना. देशपांडे, १७२
लक्ष्मी विलास, धंतोली, नागपूर–१

९३ श्री. अनंत नारायण देशपांडे, ८४
दिवसे यांचे घरीं, मेनरोड, सीताबर्डी,
नागपूर–१

९४ श्री. द. स. देशपांडे, १६३
धंतोली, नागपूर–१

९५ श्री. वी. आर. देशपांडे, १८९
काबा हाऊस, गिरी प्लॉटस्, नागपूर–१

९६ श्री. मनोहर केशव देशपांडे, ९८
डॉ. काळे यांचा बंगला, वेस्ट हायकोर्ट रोड,
धरमपेठ, नागपूर–१

र. क्र.

९७ डॉ. य. खु. देशपांडे, ३१
c/o डॉ. कोयल यांचा बंगला,
गोकुळपेठ, नागपूर–१

९८ सौ. लीलाबाई देशपांडे, ८३
c/o श्री. अनंत नारायण देशपांडे,
दिवसे यांचे घरीं, मेनरोड, सीताबर्डी,
नागपूर–१

९९ श्री. त्रि. गो. देशमुख, १५१
सरनाईकांचा बंगला, धंतोली, नागपूर–१

१०० श्री. गोपाळ सदाशिव देहाडराय, ६७
सिव्हिल इंजिनिअर,
फाटक चाळ, गोदी नं. १, सीताबर्डी,
नागपूर–१

१०१ श्री. गो. रा. दोडके, २
अॅड्. मंगळमूर्ति यांचा बंगला, धंतोली,
नागपूर–१

१०२ सौ. शांताबाई दंडिगे, २८
टेकडी लाईन, सीताबर्डी, नागपूर–१

१०३ श्री. सि. मा. धामोरीकर, ११७
बी. ए., भा.रा. रत्न,
श्री. मंगरूळकरांचा वाडा, हनुमानरोड,
सीताबर्डी, नागपूर–१

१०४ श्री. राम किसनजी धोटे, १५८
c/o शक्ति आॅफसेट वर्क्स, नागपूर–१

१०५ श्री. वासुदेवराव किसनजी धोटे, ८०
तेलीपुरा, सीताबर्डी, नागपूर–१

१०६ श्री. एम्. कृपाशंकर नियोगी, ५
श्री. भास्करराव नियोगींचा बंगला, धंतोली,
नागपूर–१

१०७ सौ. कमलाबाई पटवर्धन, ३४
सोनीलेन, सीताबर्डी, नागपूर–१

१०८ श्री. धों. स. परांजपे, १८५
छोटी धंतोली, नागपूर–१

र. क्र.

१०९ श्री. मनोहर नारायण परांजपे, १७७
स. नं. १, राममंदिर गल्ली,
महाल, नागपूर–२

११० श्री. रामचरणसिंह पवार, ८८
एम्. ए., एलएल्. बी. अॅडव्होकेट,
हनुमानरोड, सीताबर्डी, नागपूर–१

१११ सौ. कमलिनी पागे, १४०
सीतावर्डी, नागपूर–१

११२ प्रा. था. मु. पाठक, ७६
धरमपेठ एक्स्टेंशन, नागपूर–१

११३ श्री. गणेश सीताराम पाध्ये, अॅडव्होकेट, १६५
धंतोली, नागपूर–१

११४ श्री. एस्. व्ही. पाध्ये, अॅडव्होकेट, १७३
वाकररोड, नागपूर–२

११५ श्री. जयवंत पांडे, १५५
रोटकरांचा बंगला, जुनी पोस्ट ऑफिस जवळ,
धरमपेठ, नागपूर–२

११६ श्री. घु. वा. पांडे, ८२
ए. आय. आर, नागपूर

११७ सौ. कुमुदिनी श्रीधर पांढरीपांडे, ११०
बी. ए. बी. टी.
मुंजे बंगला, धंतोली, नागपूर–१

११८ श्री. लक्ष्मण विश्वनाथ पांढरीपांडे, ३९
एम्. ए., एलएल. बी.
टेकडी रोड, सीताबर्डी, नागपूर–१

११९ श्री. श्रीधर गणेश पांढरीपांडे, ८९
मुंजे बंगला, धंतोली, नागपूर–१

१२० डॉ. पु. शं. पेंडसे, एम्. बी. बी. एस्. १२७
धंतोली, नागपूर–१

१२१ श्री. माधव शंकर पेंडसे, ७५
टिकेकररोड, धंतोली, नागपूर–१

१२२ सौ. मालतीबाई पेंडसे, १६७
c/o डॉ. शं. दा. पेंडसे, काँग्रेसनगर, नागपूर–१

	र. क्र.
१२३ श्री. नारायण दामोदर पेंडसे, धंतोली, नागपूर–१	२१
१२४ श्री. दि. ब. पंडित, एम्. ए. एलएल. बी., बी. टी. झेंडा चौक, चिटणवीसपुरा, नागपूर–२	६२
१२५ श्री. व्यंकटेश नीलकंठ पंडित, "श्रीधाम", गोरक्षणसमोर, जेलरोड, नागपूर–१	१९४
१२६ श्री. मनोहर विघ्नेश्वर पंडे, c/o वामनराव भांबुरकर, टंकलेखक, तेलीपुरा, सीतावर्डी, नागपूर–१	७२
१२७ कु. ताराबाई प्रधान, अवधूत भुवन, सीतावर्डी, नागपूर–१	१३२
१२८ सौ. उमाबाई सदाशिवराव फडणवीस, c/o श्री. सदाशिवराव फडणवीस, ॲडव्होकेट, गोकुळपेठ, नागपूर–१	७८
१२९ श्री. दि. वा. फडणवीस, c/o "महाराष्ट्र" कार्यालय, नागपूर–२	१७८
१३० श्री. शं. वा. फलटणकर, गोखलेवाडा, मोदी नं. ३, सीतावर्डी, नागपूर–१	११४
१३१ श्री. नारायण प्रभाकर फाटक ७८, गोकुळपेठ, नागपूर–१	३६
१३२ श्री. सदानंद फुलझेले, कार्पोरेटर, हनुमानरोड, धरमपेठ, नागपूर–१	१२
१३३ श्री. श्रीपाद केशव बढे, टेकडी लाईन, कलार ओळ, सीतावर्डी, नागपूर–१	७३
१३४ श्री. पां. ना. बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धंतोली, नागपूर–१	२७
१३५ श्री. श्यामकांत बनहट्टी, कांग्रेसनगर, नागपूर–१	१५३
१३६ व्यंकटेश शामराव बलकुंदी, टिकेकररोड, धंतोली, नागपूर–१	२५

	र. क्र.
१३७ श्री. व्यं. रा. बुचे, टोळ यांचा दत्तनिवास, धरमपेठ नवी वस्ती, नागपूर–१	८१
१३८ श्री. प्रताप नारायण बेहेरे, कांग्रेसनगर, नागपूर–१	४३
१३९ सौ. प्रमिला प्रताप बेहेरे, कांग्रेसनगर, नागपूर–१	४३
१४० श्री. वसु. शं. भगत, c/o श्री. राम देशमुख, पोलीस नाका रोड, स. नं. ७ नागपूर–२,	१६०
१४१ श्री. ग. नी. भवाळकर, महाजन चाळ, सीतावर्डी, नागपूर–१	१२३
१४२ श्रीमती शांताबाई भाटवडेकर, जी. अे, जुनी रामदासपेठ, नागपूर १	१४४
१४३ श्री. भास्कर दत्तात्रय भावे स्ट्रीट नं. २, धंतोली, नागपूर–१	२०
१४४ श्री. गो. वा. भिडे, अरुण प्रिंटिंग प्रेस, धंतोली, नागपूर–१	११९
१४५ श्री. चंद्रशेखर परमानंद भिशीकर, जेलरोड, नागपूर–१	१९०
